# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ३८ //स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त// (ऑनलाईन अॅपव्दारे) दिनांक : २४/११/२०२०**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२४/११/२०२० मंगळवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/ नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग व्दारे) स्थायी समिती सभापती पाटील राजेंद्र झिपरू यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी ऑनलाईन पध्दतीने खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. पाटील राजेंद्र झिपरू सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | बाविस्कर किशोर रमेश |
| सोनवणे मुकुंदा भागवत | काळे अमित पांडुरंग |
| देशमुख प्रतिभा गजानन | पाटील कुलभुषण विरभान |
| काळे रेश्मा कुंदन | लढढा नितीन बालमुकुंद |
| चव्हाण ज्योती बाळासाहेब | बरडे नितीन मनोहर |
| बेंडाळे उज्वला मोहन | नाईक प्रशांत सुरेश |
| नेरकर सरिता अनंत | शेख सैईदा युसुफ |
| कोल्हे ललीत विजय | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, उपायुक्त,प्रशांत पाटील, मुख्यलेखापरिक्षक,संतोष वाहुळे , मुख्यलेखाधिकारी, श्री.कपिल पवार, सहा.आयुक्त .श्री.पवन पाटील, सहा.आयुक्त.आकाश डोईफोडे व नगरसचिव ,श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.**

**मा.सभापती :-** आजची ही सभापती निवडीनंतरची पहिली सभा, या सभेमध्ये जे नविन नियुक्त झालेले सदस्य तसेच उपस्थित सर्व सन्मा.सदस्य यांच मी स्वागत करतो आणि मला ही महत्वपुर्ण जबाबदारी दिली तर आमचे नेते सन्मा.माजी जलसंपदा मंत्री श्री.गिरीषभाऊ महाजन, शहराचे आमदार श्री.राजुमामा भोळे तसेच जिल्हाध्यक्ष श्री.दिपकभाऊ सुर्यवंशी यांचे मी सर्वप्रथम आभार मानतो. तसेच जळगांव शहराच्या महापौर सौ.भारतीताई सोनवणे, सभागृह नेते श्री.ललितभाऊ कोल्हे, गटनेते श्री.भगतभाऊ बालाणी तसेच या सोबतच जी निवडणुक झाली ही निवडणुक बिनविरोध होण्यासाठी विपक्षनेते आदरणीय माजी महापौर श्री.नितीनभाऊ लढढा, विरोधीपक्ष नेते श्री.सुनिलभाऊ महाजन तसेच शिवसेनेचे शहर अध्यक्ष श्री.शरदभाऊ तायडे व ज्यांनी उमेदवारी भरलेली होती ते श्री.नितीनभाऊ बरडे या सर्वांमुळे सभापती पदाची ही निवडणुक बिनविरोध झाली यांनाही मी खुप खुप धन्यवाद देतो असच माझ्या कार्यकाळात आपण सर्वांनी वर्षभर सहकार्य कराव अशी मी त्यांना विनंती करतो.आपण सर्व मिळुन जळगांव शहराचा जो विकास आहे तो सर्वांगीन विकास कसा सादता येईल यासाठी सर्वांनी प्रयत्न करायचे आहे. तसेच आपण कोरोनाच्या काळामध्ये आपले महापालिकेचे आयुक्त सन्मा.श्री.सतिशजी कुलकर्णी, सर्व उपायुक्त, अधिकारी यांनी कोरोना काळात खुप चांगल्या प्रकारे नियोजन केल. आणि आपले महानगरपालिकेचे सर्व डॉक्टर असतील, सिस्टर्स असतील आशा वर्कर असतील यांनी घरापर्यंत कॉलन्यांमध्ये जाऊन सर्वे करुन कोरोनामुक्त आपल जळगांव शहर केल जाईल यासाठी प्रयत्न केलेत. विशेष करुन डॉक्टरांच मी अभिनंदन करतो आणि त्यांना धन्यवाद देतो की, त्यांनी दिवसरात्र सेवा बजावत असतांना आपल्या जिवाची परवा न करता, मला वाटत आपले काही डॉक्टर कोरोना बाधितही झाले. आणि ते चांगले झाल्यानंतर कोरोनाची सुसेवा सुरु केली आणि त्यांना चांगल करण्यासाठी प्रयत्न केला मी त्यांच अभिनंदन करतो आणि त्यांना धन्यवाद देतो, यापुढे कोरोना हा फक्त जळगांव शहरात नव्हे तर महाराष्ट्र भर असेल, देशभर असेल, जगभर असेल हा संपलेला नाही. आपण या नजीकच्या काळामध्ये या महिना भरामध्ये शहरातील नागरीक बरेच घराच्या बाहेर पडलेत. बाजारपेठेत आम्ही बघितले, दिवाळी असेल दसरा असेल मोठया संख्येने नागरीक बाहेर पडले. आणि मला वाटत त्याचा जो परिणाम आहे कोरोनाचा आपल्याला या १० ते १५ दिवसात वाढलेला दिसुन येण्याची शक्यता आहे. तरी आपण ज्या पध्दतीने आता पर्यंत काम केलं. या पध्दतीने आपण काम कराल अशी मी आशा बाळगतो. आणि सर्वांना पुनश्च धन्यवाद देतो. आणि आता नगरसचिव यांनी सभेच्या पुढील कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** विषय पत्रिकेवरील विषयांना सुरूवात करण्यात येत आहे.

**नगरसचिव :- विषय क्र. १:-** दि.३०/०९/२०२० रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषय मान्य आहे.

सौ.रेश्मा काळे :- माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदय, सभापती महोदय,

**मा.सभापती :-** नवनाथभाऊ आवाज येत आहे का ?

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हो आवाज येत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदय, सभापती महोदय,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषय मान्य आहे.

**मा.सभापती :-** नवनाथभाऊ थोड थांबुन घ्या. तांत्रीक अडचण आहे थांबुन घ्या थोड.

**श्री.ललित कोल्हे :-** काही तांत्रीक अडचण आहे का ? नितीन बरडे येत आहे का आवाज ?

**श्री.नितीन बरडे :-** बोला भाऊ, आवाज येत आहे.

**श्री.ललित कोल्हे :-** सभागृहामधुन सभापतींचा आवाज येत आहे का ?

**श्री.नितीन लढढा :-** ललित भाऊ ही सिस्टीमच चुकीची ठेवलेली आहे. ही सिस्टीम टोटल फेल्युवर आहे.

**श्री.ललित कोल्हे :-** किती तांत्रीक अडचणी आहे आता नाशिक मध्ये पण केली ना.

**श्री.नितीन लढढा :-** केली ना, केली ना.

**श्री.ललित कोल्हे :-** मग आपण ही करायला पाहिजे.

**श्री.नितीन लढढा :-** आजची ही मिटींग स्थगित करायची आणि स्थगित करुन सभागृहातच घ्या.

**श्री.ललित कोल्हे :-** राजु भाऊ, कोणालाच आवाज येत नाही. जे लोकं कनेक्टेड आहे त्यांचाच आवाज येत आहे फक्त. बाकी सभागृहातला आवाज येत नाही कोणाला.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** १५ मिनीटासाठी तहकुब करा आणि नंतर मिटींग सभागृहातच करावी.

**श्री.नितीन लढढा :-** वाटलस तर उद्या ठेवा.

**श्री.ललित कोल्हे :-** सभागृहात मिटींग आयोजित करण्यात यावी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभागृहात ठेवा मिटींग, सायंकाळी ४.०० वाजता.

**श्री. नितीन लढढा :-** सभापती महोदय, सर्व प्रथम आपले अभिनंदन, सभापती झालेनंतर ही पहिली मिटींग परंतु या सिस्टीम मध्ये साऊंड सिस्टीमचा तेवढा मोठा व्यत्यय आहे की, सभागृहाची चर्चाच लक्षात येत नाही. दुसरे नाशिक महानगरपालिकेने स्वत: ही स्थायी समितीची मिटींग ही ऑफलाईन घेऊन आणि ऑफलाईन घेतल्यानंतर शासनाला कळवुन दिले की, आम्ही ही सभा जी आहे ती ऑफलाईन घेतलेली आहे. कारण फक्त १६ सदस्य असतात आणि १६ सदस्यांमध्ये सोशल डिस्टन्सींगचा योग्य पध्दतीने पालन करता येतं. आताच १० दिवसापुर्वी नाशिक महानगरपालिकेचे सभापती मा.श्री.गणेशजी गिते माझ्या घरी आलेले होते. आणि त्यांनी सुध्दा हेच सांगितल की, या ऑनलाईन मिटींग मध्ये खुप गोंधळ हातो आणि कामकाज समजत नाही. या अनुषंगाने आम्ही शासनाची कुठलीही पुर्वपरवानगी न घेता, मिटींग ऑफलाईन घेऊन शासनाला तसे कळवुन दिलेले आहे. तर आपणास ही विनंती आहे की, आजची ही सभा तहकुब करुन एकतर दुपारुन किंवा उद्या या सभेच ऑफलाईन आयोजन कराव ही विनंती आहे.

**श्री.नवनाथ दरकुंडे :-** नितीन भाऊच्या सुचनेला माझी मान्यता आहे.

**श्री.ललित कोल्हे :-** राजु भाऊ आवाज येत नाही.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आवाज येत नाही.

**श्री.नितीन लढढा :-** आवाजच येत नाही राजु भाऊ. मा.आयुक्त महोदय, नाशिक महानगरपालिकेच्या सभापती आठ दिवसापुर्वी माझ्या घरी आले होते आणि त्यांनी सुध्दा ऑफलाईन मिटींग घेऊन तसे राज्य शासनाला कळवुन दिले. त्यांनी संपुर्ण सोशल डिस्टन्सींगच पालन करुन ऑफलाईन मिटींग घेतलेली आहे. आणि तशी माहिती राज्य शासनाला अवगत केलेली आहे. मला वाटत की, एकतर आपल्या सभा महिने महिने दोन दोन महिन्यानंतर होतात आणि त्याच्यामध्ये सभेच कामकाज प्रत्येक सदस्याला कळत नाही. नेमकी चर्चा काय होते कुठल्या विषयावर होते तेच कळत नाही. या सभेला तसे ही अर्थ उरत नाही.

**मा.सभापती :-** हॅलो, आवाज येत आहे नितीन भाऊ.

**श्री.नितीन लढढा :-** हो आता येत आहे.

**श्री.ललित कोल्हे :-** आता येत आहे.

**मा.सभापती :-** चला सभेच्या कामकाजाला सुरुवात करु या.

**श्री.नितीन लढढा :-** हो आता येत आहे. सभापती महोदय.

**मा.सभापती :-** हा बोला.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदय, इतिवृत्ताचा विषय आपण मंजुर करतात. परंतु इतिवृत्ताचा विषय मंजुर करतांना पान नं.८ मागील स्थायी समितीच्या सभेमध्ये झालेली चर्चा, पान नं.८ मध्ये शेवटच्या कॉलम मध्ये मी सभापती महोदयांना प्रश्न उपस्थित केलेला होता. पान नं.८ आणि पान नं.९ याच आपण वाचन कराव. पान नं.८ आणि पान नं.९ वर मी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याच फक्त वाचन कराव. म्हणजे परिस्थिती आपल्या लक्षात येईल.

**मा.सभापती :-** कोणता १४ व्या वित्तीय आयोगाचा.

**श्री.नितीन लढढा :-** नाही नाही, वाहनांच्या टायरच्या संदर्भातला आहे. पेज नं.८ ला .

**मा.सभापती :-** पेज नं.११ की ८.

**श्री.नितीन लढढा :-** पेज नं.८ ला शेवटचा कॉलम.

**मा.सभापती :-** कोविडचा विषय आहे शेवटचा कॉलम.

**श्री.नितीन लढढा :-** हा, ते फक्त नगरसचिवांना वाचायला सांगा.

**मा.सभापती :-** पेज नं.८ वरील सन्मा.सदस्य श्री.नितीन लढढा यांची मांडलेली सुचना नगरसचिव यांनी वाचावी.

**नगरसचिव :- (दि.३०/०९/२०२० रोजी झालेली स्थायी समिती सभेचे कार्यवृत्तातील पेज नं.८ वरील सन्मा.सदस्य श्री.नितीन लढढा यांची सुचना पुढील प्रमाणे नगरसचिव यांनी वाचन केली.)**

सभापती महोदया, आज साधारणत: आज आपल्या सभेचा शेवटचा दिवस आहे. आपल्याला एक वर्षाची जी संधी मिळालेली होती. आज आपली जी टर्म होती ती जवळपास ६ महिने कोविड मध्ये निघालेली आहे.आपण या १ वर्षाच्या कारकिर्दीत जळगांव शहर महानगरपालिकेच्या सन्मा.स्थायी समिती सभापती पदी योग्य पध्दतीने योग्य हाताळुन सर्व सदस्यांना योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला. जरी आपल्याला वर्षभराचा कालावधीची संधी मिळाली परंतू आपण कोविड मुळे आपली जी भुमिका होती ती अत्यंत चांगली होती. विशेषत: सभागृहात झालेल्या फस्टेंशन नंतर पारीत झालेले ठराव हा चोविस तासांच्या आत पाठविण्याचा आपण एक चांगला पायंडा या महानगरपालिकेमध्ये सुरू केलेला आहे. त्याचे मी आपले मनापासुन अभिनंदन करतो . निश्चितपणे आपली कारकिर्द स्मरणात राहील आणि ज्या काही भविष्यात पुढील संधी आपल्याला मिळतील. त्या संधीच्या अनुशंगाने मी आपल्याला पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा देतो. आज आपली सभापती पदाची शेवटची सभा आहे. ती ही पुर्ण निर्वीवादाच्या वातारवणात पार पडलेली आहे.परंतू फक्त आता आपल्या वतीने प्रशासनाला एक सुचना मांडु ईच्छितो कि साधारणत: आपण एक महिन्यापुर्वी या स्थायी समितीच्याच सभागृहामध्ये महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या जेसीबीच्या टायरच्या संदर्भातील चर्चा केलेली होती आणि तब्बल आता त्याला एक महिना उलटला आहे. जवळपास मी म्हणतो की ९ महिन्यापुर्वी प्रस्ताव हा महानगरपालिकेच्या जेसीबीचे टायर बदलण्याचा प्रस्ताव हा एक साधारणत: हा दि. ११/१२/२०१९ पासुन सुरू झालेला आहे प्रस्ताव आणि अद्यापपावेतो सुध्दा त्या वाहनांना टायर उपलब्ध करून दिलेले नाही. माझी एकच विनंती आहे की ही सभा संपल्यानंतर आपण आणि मा.आयुक्त महोदय आपण एकदा कचरा डेपोवर भेट द्यावी. कचरा डेपोवरची परिस्थिती बघावी. तेथील त्या टायरांची खात्री करावी. म्हणजे आज मला सांगा की आपली लाखो रुपयांची मशिनरी ती निव्वळ ५० हजार ते लाख दोन लाख रूपयांच्या टायर साठी हि तिथे पडुन आहे. तसेच त्याची परिस्थिती ईतकी ढिसाळ झालेली आहे की ती डोळयाने तुमच्याकडून पाहविली सुध्दा जाणार नाही. अश्या पध्दतीने मी पोटतिडकीने सभागृहात एक एक महिन्यापुर्वी चर्चा करून सुध्दा एक एक वर्षा पुर्वीचे प्रस्ताव हे मंजुर होत नसतील तर कश्या प्रकारच्या पध्दतीचे प्रशासनाकडुन कामाच्या अपेक्षा ठेवाव्यात की ज्या वेळेला गतीमान प्रशासन हवायला हवे होते. एक चांगल्या पध्दतीचे प्रशासन असायला पाहीजे. एक चांगला समन्वय प्रशासनामध्ये असायला हवा. चर्चा करून जर कधी प्रशासनाचे प्रश्न मार्गी लागत असतील मग शेवटी मग कितीही बोलले तर तेही योग्य वाटत नाही. आंदोलन केले तेही योग्य वाटत नाही. मग कुठल्या मार्गाने जावे प्रशासनाकडे याबाबतीत प्रशासनाने आधी खुलासा करावा. त्याच अनुषंगाने टायरांच्या बाबतीत एक भुमिका सांगतो आदरणीय सभापती महोदया कि आजच्या साधारणत: १ महिन्यापुर्वी गणपती विसर्जनाच्या आदल्या दिवशी टि. बी. सॅनिटोरियमच्या वाहनतळावर गणपती विसर्जन कामी आयुक्त महोदय भेट द्यायला गेलेले होते त्यावेळेला मा.आयुक्त महोदय, उपायुक्त. कपिल पवार साहेब, कैलास आप्पा आणि मी स्वत: महानगरपालिकेच्या बंद पडलेल्या वाहनांची परिस्थिती त्यांना आम्ही तेथे निदर्शनास आणुन दिली.आज कोट्यवधी रुपयांचे कॉम्पॅक्टरची स्थिती मा.आयुक्त महोदयांनी त्यांच्या डोळयादेखत पाहीली सर्व सखोलाने पाहीली. आयुक्त महोदयांनी ते कॉम्पक्टर तात्काळ दुरूस्ती साठी कोणाला तरी आदेश दिलेले होते. आज तब्बल एक महिन्याचा कालावधी झाला. त्याच्यात नेमकी कुठे अडचण झालेली आहे.जेव्हा स्वत: आयुक्त महोदय अश्या पध्दतीचे कामाला दिशा मिळुन जर कधी कामाला गती प्राप्त होत नसेल. तर या महानगरपालिकेचा कारभार चालणार कसा आणि अश्या पध्दतीने कोट्यावधी रूपयांच्या वाहनांची ही माती होईल आणि ती भंगारच्या भावात मातीमोल भावात ती विकली जातील. मग अश्या पध्दतीने कोट्यावधी रूपयांच्या वाहनांचे ज्यावेळी माती होत असेल तर हे कुठपर्यंत सहन करायचे. आपण मा.आयुक्त महोदयांना विचारा कि आयुक्त महोदय स्वत: तेथे

आलेले होते आणि कैलास आप्पा सुध्दा होते मी होतो कपिल पवारजी साहेब होते सहा.आयुक्त साहेब होते. परंतू याबाबतीत वाहन विभाग कुठेही काहीही हालचाल करायला तयार नाही म्हणजे किती किती निष्काळजी पणा म्हणावा याला की अश्या कोट्यावधी रूपयांच्या किती मालमत्ता महानगरपालिकेच्या ज्या दुर्लक्षित होताहेत. आपण यापुर्वी गिरणा पंपींगच्या पाईपलाईनच्या संदर्भात मशिनरी च्या संदर्भात कितीवेळा बोललेलो आहे. कोट्यावधी रूपयांची मशिनरी आहे . कालांतराने ती सगळी भंगार होतेय व ती कवडीमोल भावात ती विकली जातेय परंतू वेळेवर या सर्व गोष्टींचे नियोजन केले तर याच कोट्यावधी रूपयांच्या मालमत्तेचे आपण काहीतरी केले तर योग्य पध्दतीने विनीयोग करू शकतो किंवा त्याची विक्री करून त्याचा पैसा उभा केला जाऊ शकतो. मल संकलित कंटेनर तेथे पडलेले आहेत. मल संकलित घंटागाड्या तेथे पडलेल्या आहेत. अश्या कोट्यावधी रूपयांच्या मालमत्तेचे जर अश्या पध्दतीने डोळयादेखत माती होत असेल तर ते योग्य नाहीये. एकीकडे आपण काटकसरीचे धोरण म्हणुन आपण विकास कामांना ब्रेक लावतो आणि ईथे कोट्यावधी रूपयांची मालमत्ता मातीमोल होतेय. आपण स्वत: जावुन एकदा व्हिजीट करा कि त्या जेसीबीच्या टायरांची परिस्थिती बघा की आपल्याला लाज वाटेल की आपल्या महानगरपालिकेच्या कोट्यावधी रूपयांच्या की ज्याचे पंक्चंरचे बिल आपण लाखो रूपये देवुन टाकलेले आहे. दिवसातुन ४ वेळा टायर पंक्चर होते. मशिनची उपलब्धता फक्त तासभर मिळते आणि लाखो रुपये टायरच्या पंक्चरचे बिल भरले जाते आणि हजारो रूपयाचे टायर विकत घेण्यासाठी आपल्याला वेळ मिळत नाहीये.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदय, आता या विषयावरुन आपल्याला लक्षात आले असेल की, नेमकी परिस्थिती काय आहे. पुनश्च: आता अश्या पध्दतीचे विषय उपस्थित करायला आता लाज वाटायला लागली आहे. म्हणजे अजुन सुध्दा त्या जे.सी.बी.ला टायर मिळालेले नाही. ते कॉम्पॅक्टर अजुन सुध्दा पुण्याला पाठविण्यात आलेले नाही.म्हणजे नेमक प्रशासन करत काय आहे. मा.आयुक्त महोदय बघा या सर्व गोष्टींना आपण स्वत: साक्षीदार आहात. आणि जवळपास ही ५ वी ६ वी मिटींग असेल की, या विषयावर चर्चा होत आहे. कुलकर्णी साहेब आम्हाला वाटल होत की, आपण एक खुप कडक प्रशासनातले अधिकारी आहात परंतु आपला वचक कर्मचाऱ्यांवरती नाही आहे की, कर्मचारी आपल्याला दुमानत नाही. नेमकी अडचण काय आहे या विषयांच्या संदर्भात. ही परिस्थितीच समजायला मार्ग नाही. तुम्ही विचारा प्रशासनाला की, आज पर्यंत त्या जे.सी.बी.च्या पंक्चरच बिल किती अदा करण्यात आलेले आहे. याच्या वरुन लक्षात येईल की, दोन वेळा नविन टायर खरेदी झाली असती त्या पैश्यांमधुन परंतु अश्या पध्दतीने ६-६ महिने वर्ष वर्षभर चर्चा करुन छोटेशे जिवनावश्यक काम आहे. दैनंदिन गरजेचे वाहने आहेत. आणि त्यांचे विषय जर मार्गी लागत नसतील. तर मला सांगा कसे काय विकास कामांवर लोकांचा विश्वास राहील.

**मा.आयुक्त :-** आदरणीय सभापती महोदय, आदरणीय नितीनभाऊ, या विषयांवर आपण जे मुद्दे मांडलेले होते त्याही वेळेला आपण हे म्हटलेले होते की, याच्या मध्ये खुप वाहन विभागाच्या प्रशासनाकडुन खुप दिरंगाई होत आहे. आणि त्याच्यानंतर पुन्हा दोन महिन्यानंतर आपण हाच विषय मांडत आहे. अर्थात आपल्याला पुन्हा पुन्हा हे विषय मांडणे हे दुर्देव्य आहे दुमत नाही. परंतु तत्कालीन जे वाहन विभागाचे प्रमुख होते. त्यांच प्रशासकीय कामकाज अत्यंत गलथानपणाच आणि अकार्यक्षम पध्दतीने ते करत होते. म्हणुन त्यांची तात्काळ या सर्व बाबींच्या पार्श्वभुमीवर तेथुन बदली केलेली आहे. त्यांच जे काही मुळपद होत महापालिकेमध्ये त्यांना पुन्हा फेरबदलीच्या ठिकाणी त्यांना पाठविण्यात आलेल आहे. शिवाय त्यांच्या कामकाजामध्ये जे आपण प्रामुख्याने मुद्दा उपस्थित केला होता की, कचरा डेपोवरचे जे.सी.बी.चे टायर बदलणे, टायरच्या किंमतीपेक्षा जास्त रक्कम त्या जे.सी.बी.चे पंक्चर दुरुस्तीवर महानगरपालिकेची खर्च झालेली आहे. आणि या सर्व बाबी अर्थातच या प्रकाराकडे केलेले दुर्लक्ष, त्याच्या नंतर जी जी वाहने बंद आहे ती वाहन त्या त्या डिलरकडे किंवा त्याच्या मॅन्युफॅक्चररकडे दुरुस्तीला पाठविण्याचा विषय आहे किंवा डिझेलच्या संदर्भातले काही मुद्दे सन्मा.त्यावेळेचे सदस्य श्री.सनकत भाऊ यांनी उपस्थित केलेले होते. अश्या काही मुद्दयांवर आपण त्यांना शोकॉज नोटीस ही दिलेली आहे. त्यांची विभागीय चौकशी आम्ही करत आहोत. त्या विभागाला आता नविन विभाग प्रमुख म्हणुन आपले अभियंता श्री.लुले नेमलेले आहे. त्यांना या बाबतीमध्ये सुचना दिलेल्या आहेत. आणि आपल्याला कंपनीकडुन मिळालेले जे जे.सी.बी. आहे. त्याची वॉरंटी पिरीयेड वगैरे सर्व विचारात घेऊन हे चारही टायर नविन खरेदी करण्याचा प्रस्ताव त्यांनी केलेला आहे. त्याची काही स्क्रुटनी सहाय्यक आयुक्त यांच्याकडुन होत आहे. आणि नजीकच्या काळामध्ये त्याची चारही टायर्स जे.सी.बी.चे आपण खरेदी करु. त्याच प्रमाणे इतर जे काही मुद्दे आपण उपस्थित केलेले आहे. गिरणा टाकी वरील काही मशिनरी असतील, काही शिवाजी नगरच्या टाकी जवळचं आपल भंगारच मटेरिअल असेल, या सर्वांच्या बाबतीत सुध्दा भंगार चोरीला जाणे किंवा भंगार राहुन गेल तर ते सडुन जातं आणि त्याची जी काही आहे स्क्रॅप व्हॅल्यु ती कमी व्हायला लागते. या दोन्ही गोष्टी टाळण्यासाठी त्याची इन्व्हेन्ट्री निश्चित करुन त्याचही लिलाव करायचा आपण प्रयत्न करतो आहे की, जेणे करुन महानगरपालिकेच नुकसान टळाव. आणि वाहन दुरुस्तीच्या बाबतीमध्ये या पुढच्या काळामध्ये नविन वाहन

विभाग प्रमुख जे आहे ते सहा.आयुक्त आणि उपायुक्तांच्या मार्गदर्शनाखाली अश्या प्रकारची परिस्थिती पुन्हा उदभवणार नाही. याची दक्षता घेतील अशी मी ग्वाही देतो.

श्री.नितीन लढढा :- याला कुठेतरी कालमर्यादा बांधुन द्या सर. काय आहे ना सर आपण प्रत्येक वेळेला चर्चा गांभिर्याने करतो. परंतु खालच्या प्रशासनातल्या कर्मचाऱ्यांना याच गांभिर्य नसत. प्रत्येक कामाला कालमर्यादा जर निश्चित केली तर त्याच गांभिर्य लक्षात येईल.आणि जबाबदारी निश्चित केल्यानंतर जो कोणी कामामध्ये कसुर करत असेल. निश्चितपणे त्याच्यावर कुठेतरी दंडात्मक कार्यवाही अपेक्षित आहे.

**मा.आयुक्त** :- निश्चितच याच्यामध्ये मी लेखापरिक्षकांना समक्ष सुचना दिलेल्या आहे. आणि आताही सगळयांसमोर पुन्हा सुचना देतो की, जर एखाद्या विभागाच्या किंवा एखाद्या कर्मचाऱ्याकडुन केवळ दुर्लक्ष किंवा हलगर्जीपणामुळे जर नुकसान होत असेल तर लेखापरिक्षकांनी त्याची जबाबदारी संबंधीत कर्मचाऱ्यांवर व अधिकाऱ्यांवर निश्चित करावी. उत्तरदायीत्व प्रत्येकाला असले पाहिजे. आपल काम चोख पध्दतीने आपण जे म्हणत आहे वेळेच्या बंधनामध्ये पुर्ण करण्याची दक्षता घेऊ. टायरच्या बाबतीमध्ये पुढील १५ दिवसात कोटेशन प्रक्रिया पुर्ण करावी. अश्या प्रकारच्या आपण त्याला बंधन घालु. जेणे करुन या पुढच्या काळामध्ये तरी निदान टायर नाही म्हणुन पंक्चरवरचा खर्च वाढणार नाही याची आपण खबरदारी घेऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय या विषयाला लागुनच एक विषय आहे. नितीन भाऊंनी जो विषय उपस्थित केला तो योग्य आहे. त्या ठिकाणी आम्ही पाहणी केली कचरा डेपो आणि टी.बी. हॉस्पीटलला, अजुन एक विषय आहे फायरच्या गाडया, चार गाडया तयार होऊन पडलेले आहे त्यांचपण असच होणार आहे का ? हॅलो हॅलो अध्यक्ष महोदय.

**मा.सभापती :-** नवनाथ भाऊ आधी आपण अजेंडयावरचे विषय पुर्ण करुन घेऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय, वाहन विभागाचा विषय आहे. नितीनभाऊ बरडे यांनी पण हा विषय मांडला होता. याच्यावर उत्तरच कोणी द्यायला तयार नाही. त्या अश्याच भंगार होतील का त्या गाडया, त्याचा कसा पाठपुरावा करायचा लोकप्रतिनिधींनी.

**मा.सभापती :-** आपण आधी विषय घेऊ अजेंडयावरचे हे पुर्ण करा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषयाला लागुनच आहे ना. मागच्या मिटींगच इतिवृत्त कायम करत आहे तुम्ही त्याच्या मध्येच आहे ना. याच्यावर पण विषय केला पाहिजे. चार फायरच्या गाडया तयार आहे आपल्या पुण्याला, ते भंगार मध्ये विकल्या जातील तेव्हा आणणार आहे का ? जसी आता परिस्थिती सांगता आहे नितीन भाऊ तशीच परिस्थिती आहे त्याची पण. नाही तर सांगाव आयुक्तांनी की, काय पोझीशन आहे. अग्निशामक दलाने नाही तर उत्तर द्याव. त्या गाडयांची पोझीशन काय आहे. विचारा जरा काय पोझीशन आहे.

**सहा.आयुक्त श्री.पवन पाटील :-** सन्मा.सभागृह सन्मा.सभापती पाईपच्या गाडया ज्या आहेत आपण ज्या बांधणी केलेल्या आहे. त्यांच थर्ड टाईमच इन्स्पेक्शन झालेल आहे आणि १५ टक्केची त्यांच शेवटच बिल प्रस्तावीत करण्यात आल आहे. त्याची मान्यता मिळताच त्या गाडया आपल्याला हॅण्डओवर करणार आहे. त्यांची बांधणी पुर्णता पुर्ण झालेली आहे.ते लवकरच महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यात येणार आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझ्या माहितीनुसार साहेब त्या ठेकेदारांनी वर्कऑर्डरच्या प्रमाणे काम केलेल नसल्याने त्याला दंड आकारणी केलेली आहे. ते दंड आकारणी वसुल होत नाही म्हणुन आपण लोकं ताबा घेत नाही. अशी माहिती मला मिळालेली आहे. दंड आकारण्याचा जो विषय आहे त्यावर वाहन विभाग प्रमुखांनी स्पष्ट मत दिलेल आहे की, दंड आकारण्याचा याबाबत काही प्रश्न येत नाही. मक्तेदारांनी ते काम वेळेत पुर्ण केलेल आहे. वाहन विभागाकडुन फक्त थर्ड टाईमच जे इन्स्पेक्शन आहे ते करण्याला उशीर झालेला होता, त्यामुळे त्या गाडया आपल्या ताब्यात येण्यास उशीर होत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब लवकरात लवकर करण्याचा प्रयत्न करा.

**सहा.आयुक्त श्री.पवन पाटील :-** आपल्याकडुन इन्स्पेक्शन उशीरा झाल्यामुळे ते ताब्यात मिळणेस उशीर होत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** आता किती गाडया अव्हेलेबल आहे आपल्याकडे. आता फायरच्या गाडया किती अव्हेलेबल आहे.

**सहा.आयुक्त श्री.पवन पाटील :-** तिन गाडया अव्हेलेबल आहे.

**श्री.नितीन बरडे :-** महाबळ स्टेशनला का गाडी राहत नाही सद्या. परवाच्या दिवशी हायवेवर जी गाडी जळाली, ती गाडी जळाली असतांना फोन केला होता, महाबळ स्टेशनला जर गाडी राहीली असती तर १० मिनीटात पोहचली असती. दिड तासाने गाडी पोहचली तो पर्यंत गाडी जळुन गेली, आकाशवाणी चौकात परवा एक गाडी जळाली, महाबळ स्टेशनवर जर गाडी राहीली असती तर १० मिनीटात गाडी पोहचली असती तेथे फायरची, त्या महाबळ स्टेशनला कोणीच नाही. कचरा साचलेला आहे तेथे, लोक तेथे प्रायव्हेट गाडया लावता आहे. मुलं तेथे रात्री पित आहे. ऐवढ चांगलं फायर स्टेशन बनविलेल आहे तेथे कोणीच नाही.

**श्री.लासुरे, वाहन विभाग :-** अग्निशमन विभागाकडे तीन फायर फायटर आहे.

**श्री.नितीन बरडे :-** रात्री दारु चा अड्डा चालत आहे त्या फायर स्टेशनला. दारु पिणाऱ्यांची गर्दी आहे तेथे. परवा आकाशवाणी चौकात गाडी जळाली, महाबळ स्टेशनला जर गाडी राहीली असती तर १० मिनीटात पोहचली असती.

**श्री.लासुरे, वाहन विभाग :-** अग्निशमन विभागाकडे तीन फायर फायटर आहे. परंतु त्या फायर फायटरच नियोजन करण्याच काम अग्निशमन अधिकाऱ्यांच आहे.

**श्री.नितीन बरडे :-** आहो साहेब, तुमच उत्तर काय येणार आहे हे मला माहित आहे. फायरवाले म्हणतील आमच्याकडे माणसं उपलब्ध नाही. माणसांची कमतरता आहे. ते माणस आणि ड्रायव्हर काय करत आहे आम्हाला माहित आहे.परवाचीच गोष्ट आहे. आकाशवाणी चौकात एक कार जळाली, १० मिनीटात फायर स्टेशनची गाडी पोहचली असती.जर गाडी राहिली असती तर. दोन तासानंतर फायरची गाडी आल्यावर ती गाडी जळुन खाक झालेली होती.

**मा.आयुक्त :-** नितीन भाऊ, आज अग्निशमन विभागाचे विषय नसल्यामुळे ते सभागृहात आलेले नाहीत. परंतु जर सभापतींच्या सुचना असतील तर आपण त्यांना बोलवुन घेऊ. आणि ते आल्यानंतर पुन्हा या विषयावर चर्चा करायला काही हरकत नाही.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब काही हरकत नाही. साहेब ते फायर स्टेशन इतकं चांगल बनविलेले आहे आणि तो दारु चा अड्डा बनलेला आहे संध्याकाळी.

**मा.आयुक्त :-** अग्निशमन बारींना बोलवुन घेऊ आपण आणि बाकीचे विषय संपत आल्यानंतर या विषयावर चर्चा करु. विषय महत्वाचा आहे आपण त्यांना उपस्थित करुन घेऊन फायर स्टेशन कार्यरत करण्यामध्ये काय अडचण आहे जाणुन घेऊ.

**श्री.नितीन लढढा :-** महानगरपालिकेकडुन एक परमिट रुमच ॲपलीकेशन करुन टाका साहेब. जर कधी नितीन भाऊ बरडे सांगत असतील की, तेथे दारुच्या अड्डा झालेला आहे. जर त्याला अधिकृत परमिट रुम घेऊन घेतला तर महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल.

**मा.सभापती :-** संबंधीत विभाग प्रमुख येत आहे ते आल्यावर आपल्याला याच्यावर सविस्तर चर्चा करता येईल.

**श्री.नितीन बरडे :-** चला राजु भाऊ पुढचा विषय घ्या.

**मा.सभापती :-** नवनाथ भाऊ सुचक म्हणुन मान्य आहे का ?

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** श्री.नितीन भाऊ लढढांनी जे विषय सांगितल त्याला धरुनच मान्यता देण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २८५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, दि.३०/०९/२०२० रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन स्थायी समिती सभेतील कार्यवृत्तामध्ये जादा विषय क्रं. १ पान नं.८ मध्ये मुख्य लेखाधिकारी यांनी डेंग्यु, चिकनगुणिया, मलेरिया आणि किंवा इतर जो आपल्याला खर्च येणार आहे हा खर्च आपल्याला जो दिलेला आहे १४ वा वित्त आयोगातुन त्याच्यातुनच खर्च करावा लागेल असे तांत्रिक चुकीमुळे नमूद करण्यात आलेले असून त्याऐवजी १४ व्या वित्त आयोगातुन खर्च करता येणार नाही सदरचा खर्च संसर्गजन्य आजार व नियंत्रण त्याच्यातूनच आपल्याला करता येईल अशी दुरुस्ती करुन दि.३०/०९/२०२० रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**
**अनुमोदक :- काळे रेश्मा कुंदन**

**नगरसचिव :- विषय क्र. २:-** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२१ करीता स्थायी समिती ठराव क्रं.२७७ दि.१५/०९/२०२० अन्वये श्री.पवन पंढरीनाथ चौधरी यांची कंत्राटी तत्वावर सिटी कॉर्डीनेटर म्हणून जळगांव शहर महानगरपालिकेत अटी शर्तीस बंधनकारक राहुन कंत्राटी तत्वावर ६ महिने करीता तात्पुरती नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आलेली आहे तथापी उपरोक्त ठरावामध्ये प्रस्तावास झालेला विलंब व झालेल्या अनियमितेबाबत आक्षेप नोदविण्यात आलेला असल्याने सदर आक्षेप ठरावातून वगळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** दोन नंबरच्या विषयाची सदरील माहिती घेतली असुन त्याच्यात असे लक्षात आले आहे की, सदरील ठराव हा तीन महिन्यानंतर दुरुस्त करता येईल. त्यामुळे हा विषय तहकुब करण्यात यावा.

**श्री.नितीन बरडे :-** सभापती महोदय यांच काम काय आहे यांना आपण जो कंत्राटी पध्दतीने देत आहे तर.

**मा.सभापती :-** अमितभाऊ काळे.

**श्री.नितीन बरडे :-** राजु भाऊ.

**मा.सभापती :-** हा बोला.

**श्री.नितीन बरडे :-** आपण या स्वच्छ सर्व्हेक्षणासाठी कंत्राटीवर अधिकारी नेमतो आहे. तर यांच कामकाज काय आहे.

**मा.सभापती :-** आपल्या शहराला जो गुण आणि क्रमांक आहे. पर्यावरण संदर्भात स्वच्छते संदर्भात, शासनाने त्यांची नेमणुक केलेली आहे.

**श्री.नितीन बरडे :-** स्वच्छतेसाठी त्यांची नेमणुक केलेली आहे पण त्यांच कामकाज काय ?

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय, आपण विषय घेऊ तेव्हा चर्चा करु त्याची.

**श्री.नितीन बरडे :-** हा विषय तोच आहे ना. स्वच्छ सर्व्हेक्षणाचाच विषय आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** हो पण आता तो विषय आपण तहकुब करतो आहे. जेव्हा विषय सविस्तर विषयपत्रिकेवर येईल तेव्हा चर्चा करु ना.

**श्री.नितीन बरडे :-** समता नगरला सार्वजनिक शौचालय मध्ये सर्व लाईट बंद आहे. तेथे स्वच्छता होत नाही.

**सौ.ज्योती चव्हाण :-** हो मान्य आहे.

**श्री.नितीन बरडे :-** स्वच्छ सर्व्हेक्षण मध्येच आहे ना. मग जेव्हा टिम येते स्वच्छ सर्वेक्षणची, केंद्राची येते मग राज्याची येते. तेव्हा फक्त त्यांना पैसे देऊन हॉटेलला जेवन घालुन टक्केवारी मिळवुन चालु द्यायच का ?

**सौ.ज्योती चव्हाण :-** आपण जेव्हा विषय घेऊ तेव्हा सविस्तर चर्चा करु असं म्हणण आहे माझ. आता आपण पुढचे विषय घेऊ. आता आपण हा विषय तहकुब केलेला आहे ना.त्या वेळेस आपल्याला बोलता येईल सविस्तरपणे. मला ही बोलायचे आहे.

**मा.सभापती :-** नितीन भाऊ, ताईंचे म्हणणे फक्त इतकेच आहे की, ज्या वेळेला विषय चर्चेला येईल त्यावेळेस आपण सविस्तर चर्चा करु.

**सौ.ज्योती चव्हाण :-** आणि मला ही बोलायचच आहे त्या विषयावर.

**श्री.नितीन बरडे :-** तो पर्यंत सार्वजनिक शौचालय मध्ये जे लाईट लावलेले आहे. हायमास्ट लावलेले आहे. तो पर्यंत बंद ठेवायचे का तिन महिने.

**सौ.ज्योती चव्हाण :-** त्याचे सुचना देऊन टाका तसे सभापती महोदय,

**श्री.नितीन बरडे :-** तेथे स्वच्छता होत नाही तिन महिने लाईट बंद ठेवायचे का ? ते लाईट बंद असल्यामुळे लोकं शौचालयच्या बाहेर येत आहे.

**मा.सभापती :-** कामाच्या बाबतीमध्ये बोलु शकता तुम्ही.

**श्री.नितीन बरडे :-** माझ म्हणण तेच आहे ना की, त्यांच कामकाज काय आहे. हे जे अधिकारी आपण नोंदत आहे त्यांच काम काय ?

**श्री.ललित कोल्हे :-** राजु भाऊ पुढचा विषय घ्या.

**श्री.नितीन बरडे :-** पुढचा विषय घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २८६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, स्थायी समिती ठराव क्रं.२७७ दि.१५/०९/२०२० रोजी पारित झालेला असून त्यास अदयाप तिन महिने पूर्ण झालेले नसल्यामूळे व नियमाप्रमाणे ठराव पारीत झाल्यानंतर त्यामध्ये तीन महिन्यांच्या आत कोणताही फेरबदल करता येत नसल्यामूळे सदरचा विषय तोपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**नगरसचिव :- विषय क्र. ३ :-** श्री.विजय एस.शेट, आयकर सल्लागार यांना मुदतवाढ देणे व वाढीव मुदतीसाठी येणारा रक्कम रु.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.सभापती महोदय,

**मा.सभापती :-** बोला, बोला.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदय, या आयकर रिटर्न दाखल करण्याच्या संदर्भात सदरहु मक्तेदाराला ज्या वेळेला दोन निविदा मागुन दिलेल्या होत्या. सन २०१७-१८ च काम देण्याच्या संदर्भातील. तर त्यांना सन २०१७-१८ च्या नंतर कन्टीन्युसली मुदतवाढ देण्यात आलेली होती. आणि ही जी निविदा मागवली दरपत्रक मागवुन कोटेशन पध्दतीने हे केलेल होत. तर याला एकुण खर्च किती अपेक्षित आहे एक वर्षाला. एकावर्षाला खर्च किती अपेक्षित आहे.

**मा.सभापती :-** माहिती देत आहे.

**श्री.आकाश डोईफोडे, सहा.आयुक्त :-** आदरणीय सभागृह पाठीमागील निविदेमध्ये त्यांचा टाईम पिरियेड एप्रिल २०१७ ते मार्च २०२० होता. आणि तुम्ही विचारल्या प्रमाणे की अंदाजीत वार्षिक खर्च २ लाख रूपयांच्या आसपास येईल. आणि तो परिस्थितीनुसार किंवा कर्मचाऱ्यांच्या एफ-१६ फॉर्म प्रमाणे थोडासा अंदाजित खालीवर होऊ शकतो. दोन लाखाच्या आसपास

**श्री.नितीन लढढा :-** हे निविदेद्वारे मागविल होत्या ,ऑनलाईन निविदा मागविले होते की, दर पत्रक मागविले होते.

**श्री.डोईफोडे, सहा.आयुक्त :-** सद्या तरी आम्ही ऑनलाईन निविदा मागवत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मी मागचे विचारत आहे सन २०१७-१८ ला काय मागविले होते.

**मा.आयुक्त :-** मा.नितीन भाऊ आपण सन २०१७-१८ ची माहिती घेऊ पण आताचा जो विषय आहे. तो आपण एकच आयकर रिटर्न दाखल करणाऱ्या एजन्सीकडुन काम करुन घेतो आहे. आणि आता या वर्षी आपण ई-निविदा पध्दतीने या वर्षी आपला आयकर कन्सलटंट नेमण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. आता सहाय्यक आयुक्त नविन आहे. तर त्यांना तो विषय तितकासा लक्षात आलेला नसावा. आता आपण जी निविदा काढतो आहे.ई-निविदा पध्दतीने निविदा निश्चित होऊन पुढच्या कालावधीसाठी म्हणजे चालु आर्थिक वर्षापासुन पुढच्या दोन वर्ष कालावधीसाठी जो कुठली एजन्सी निश्चित होणार आहे त्याच्यासाठी लागणारा अवधी विचारात घेता या वर्षाचे पहिले दोन्हीही कॉर्टर्सचे जे काही रिटर्न्स आहेत. कर्मचाऱ्यांच्या पगारातुन कापले गेलेले आहे. हे दाखल करायला विलंब होऊ नये म्हणुन आपण जुन्या मक्तेदाराला तेवढयापुर्ती मुदतवाढ देतो आहे. मधल्या पिरियेड मध्ये सामान्य प्रशासन विभागाकडुन ई-टेन्डरींग पुर्ण व्हाव आणि पुढच्या दोन वर्षासाठी एक नविन एजन्सी त्याच्यामध्ये निश्चित व्हावी. अश्या प्रकारचा प्रस्ताव आहे. नविन एजन्सी निश्चित होईपर्यंत आयकर रिटर्न दाखल करण्याच काम प्रलंबीत राहु नये म्हणुन जुन्या आपल्या एजन्सीला मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी स्थायी समिती समोर ठेवलेला आहे. आणि त्याच्यासाठी साधारणत: रु.१ लाखाचा खर्च अपेक्षित आहे. असे सामान्य प्रशासन म्हणजे आस्थापना विभागाचे म्हणणे आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मा.आयुक्त महोदय, या मक्तेदाराची मुद्दत केव्हा संपुष्टात आली.

**श्री.डोईफोडे, सहा.आयुक्त :-** मार्च २०२० ला संपण्यात आलेली आहे.

**श्री.नितीन लढढा :-** बरोबर आहे आता कोणता महिना चालु आहे. आज ११ वा महिना सुरु आहे.

**श्री.डोईफोडे, सहा.आयुक्त :-** हो.

**श्री.नितीन लढढा :-** म्हणजे तब्बल मला सांगा,एप्रिल पासुन आज जवळपास ८-९ महिन्यांचा कालावधी झाला, या ८ ते ९ महिन्यामध्ये याची निविदा प्रक्रिया का राबविण्यात आली नाही. आणि ती जर राबविण्यात आली नसेल तर त्याला जबाबदार कोण ? जेव्हा आपल्याला माहित आहे की, ३१ मार्च २०२० ला या मक्तेदारची मुदत संपुष्टात येणार आहे. आणि जवळपास आठ आठ नऊ नऊ महिन्यापर्यंत सुध्दा नविन निविदा प्रक्रिया न राबविण्याचा मागचा हेतु काय ? आणि याला कोण जबाबदार आहे. म्हणजे हा किती निष्काळजीपणा चाललेला आहे ज्वलंत उदाहरण आहे हे. आपण नविन आलात उपायुक्त साहेब पण या संबंधी जो कोणी खातेप्रमुख असेल त्यांच्या या जबाबदाऱ्या नाही का ? ३१ मार्चला ज्या विषयाची मुदत संपुष्टात येत असेल साधारणता त्याच्या एक महिन्यापुर्वी नविन निविदा प्रक्रिया राबविण्याच्या संदर्भात पाऊलं का उचलली गेली नाही.

**मा.आयुक्त :-** मा.सभागृह, आता आस्थापना विभागाची फाईल मी थोडीशी बघितलेली आहे. त्याच्यामध्ये मुळ तत्कालीन आस्थापना विभागप्रमुखांकडुन हा विलंबाने प्रस्ताव दाखल झालेला दिसत आहे.म्हणजे साधारणता जुन महिन्या मध्ये मागील ठेकेदाराला मुदतवाढ देण्याचा हा प्रस्ताव होता. त्याच्यावर लेखापरिक्षकांनी काही मुद्दे उपस्थित केले, त्याची पुर्तता त्यांच्याकडुन झाली आणि मग तो प्रस्ताव जो आहे तो साधारणता ऑगस्ट मध्ये हा आयुक्तांच्याकडे आलेला दिसत आहे.

आणि १९ ऑगस्टला आयुक्तांनी त्याच्यावर सुचना दिलेल्या आहेत की, वर्ष २०२०-२१ ते २०२२-२३ या तिन वर्षाच्या कालावधीसाठी वर्ष निहाय ई-निविदा मागविण्यात याव्या. म्हणजे ई-टेन्डरींग पुढच्या ३ वर्षाकरीता कराव आणि प्रत्येक वर्षासाठी स्वतंत्र दर मागवावे. अशी सुचना १९ ऑगस्टला आयुक्त यांच्याकडुन दिलेल्या आहेत. लेखापरिक्षकांनी त्याच्यावर ई-निविदा करावी असा प्रस्ताव आयुक्तांनी दिलेला होता. आणि त्याच्यानंतर ई-टेन्डरींग करण्याची प्रक्रिया त्यांची चालु आहे. आता ई-टेन्डरींग नविन असल्यामुळे त्यांना कदाचित थोडासा वेळ लागत असावा. परंतु लवकरात लवकर ही ई-टेन्डरींग पुर्ण करुन हा पुढच्या तीन वर्षाच्या पिरियडसाठी आता साधारणता अडीचच वर्ष राहिले जसे आपण म्हणत आहे त्या प्रमाणे, दोन कॉर्टर्स तर आपले या वर्षातले गेलेले आहेत. इव्हन तिसर ही कॉर्टर आता संपण्यात आलेल आहे.त्यामुळे साधारण अडीच वर्षाच्या पिरियडसाठी आपण ही एजन्सी नेमणार आहोत. आणि मागील मंजुर दराप्रमाणे या आर्थिक वर्षामध्ये दोन किंवा तीन कोर्टर्सच रिटर्न दाखल करण्याच काम आपल्याला या वेळेमध्ये कराव लागेल त्याच्यासाठी जुन्या कर सल्लागाराला मुदतवाढ देण्याची सभागृहाला विनंती करतो.

**श्री.नितीन लढढा :-** मा.आयुक्त महोदय, आपण पध्दतशीर माझ्या मुळ प्रश्नालाच बगल देतात. माझा मुळ प्रश्न हा आहे की, ३१ मार्च २०२० ला सदरहु मक्तेदाराची मुदत ही संपुष्टात येणार होती. ही बाब प्रशासनाला लक्षात नव्हती का ? आणि जर कधी ती बाब प्रशासनाला लक्षात असती. मग जुन महिन्यामध्ये प्रस्ताव पाठविण्याच अवचित्त्य काय ? ३१ मार्च २०२० ला ज्या विषयाची मुदत संपुष्टात येत असेल त्याची निविदा प्रक्रिया ही साधारणता त्याच्या एक ते दिड महिन्या आगोदर सुरु होणे अपेक्षित असत. आणि याच्यामध्ये कोण दोषी आहे. आणि का म्हणुन तो विलंब झाला. आणि जो कोणी दोषी असेल त्याच्यावर प्रशासन कार्यवाही करेल का ?

**मा.सभापती :-** भाऊ, तुमचा विषय लक्षात आलेला आहे. आणि आयुक्त साहेब, या आजच्या सभेत अजेंडयावरचा जो दोन नंबरचा विषय आहे. असाच ठराव तहकुब ठेवुन लांबण्याची जी वेळ आली तो पण तसाच होता. त्यावेळेस आपली खुप चर्चा झाली मी स्वत: तो विषय हाताळला होता. आपण कर्मचाऱ्याच नुकसान होऊ नये. त्यांनी काम केलेल आहे त्याचा मोबदला त्यांना मिळावा म्हणुन आपण त्या वेळेस तो ठराव मंजुर केला. आणि असे ठराव यापुढे येऊ नयेत. अश्या सुचना सुध्दा आपण केलेल्या होत्या. आणि जर परत परत याच्या पुढचाही जो विषय आहे. साफसफाई कर्मचारी मेलेले जनावरे उचलण्याबाबत तो सुध्दा विषय तसाच आहे. त्याचीही मुदत संपुन गेलेली आहे. त्या लोकांनी दिवाळी त्यांचा कामाचा मोबदला न मिळता त्यांनी दिवाळी साजरी केलेली आहे.मी श्री.वाहुळे साहेबांना सुध्दा त्यांचा मोबदला मिळावा म्हणुन त्यांना मी रिकवेस्ट केली होती. परंतु त्यांनी सांगितल की, स्थायी समितीच्या मंजुरी शिवाय त्यांना आपल्याला निधी देता येणार नाही. आणि असे कामगार जे आपली सेवा बजवत असतात. आणि त्यांना जर त्याचा मोबदला मिळत नसेल, तर आपले जे प्रशासनातील कर्मचारी असतील, अधिकारी असतील. यांच्यावर आपण कठोर कार्यवाही केली पाहिजे.

**मा.आयुक्त :-** मा.सभापती महोदय यांनी आणि जेष्ठ सदस्य श्री. नितीन लढढा यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहे. या निश्‍चित गंभिर आहे. आता हे दोन विषय आपल्यापुढे आलेले आहे.एक म्हणजे आपण आपल्या स्वच्छ महाराष्ट्रासाठी जो एक कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचा जो विषय आहे. आता आपण बघितला. तो ही विलंबाने आल्यामुळे स्थायी समितीने त्याच्यामध्ये काही अनियमितता आहे अश्या प्रकारचा उल्लेख केलेला होता. त्याच्या पाठीमागचा हेतू या विषयाशी कुणाचीही काही शंका असायच काही कारण नाही त्याचप्रमाणे आता आपण पाहत आहोत की, सल्लागाराची नियुक्ती करत असतांना सुध्दा मार्च मध्ये मुदत संपणार आहे हे जर तीन वर्षापासुन माहित आहे तर साधारणता निविदा प्रक्रिया स्थायी समितीची मान्यता ही पुर्ण होण्यासाठी किमान दोन ते तीन महिन्याचा कालावधी लागतो.हा अनुभव विचारात घेता, डिसेंबर २०१९ पासुनच ही प्रक्रिया खरंतर सुरु होण अपेक्षित होत. परंतु तुम्ही प्रक्रिया सुरुकरत आहात मुदत संपल्यानंतर तीन महिन्यांनी. ती आगोदर तीन महिने सुरु होण्याऐवजी ती नंतर तीन महिने सुरु झाली. आणि त्याच्यानंतर सुध्दा मुदतवाढीचा प्रस्ताव त्याच्यावर आयुक्तांचे अभिप्राय, आयुक्तांच्या सुचना, लेखापरिक्षकांचे अभिप्राय याच्या मध्ये पुढचे महिने जाणे, म्हणजे हे सगळ गृहीत धरल तर त्या विभागाकडुन तो प्रस्ताव वेळेमध्ये येत नाही. जेणे करुन मागील ठेकेदाराचे असेल किंवा कर सल्लागाराचे नविन एजन्सी नियुक्त होण्याची प्रक्रिया पुर्ण होत नाही. आणि अश्या प्रकारे आपल्याला मुदतवाढ नाईलाजास्तव द्यावी लागते. कधी पगार कोणाचे अडु नये. आपल प्रशासकीय कामकाज अडु नये म्हणुन आपण त्याला नाईलाजाने त्याला मुदतवाढ देतो. असे प्रसंग वारंवार उदभवता आहे आपली ही बाब लक्षात येत आहे. याही दोन प्रकरणामध्ये किंवा यापुढे असे काही कुठले आले अश्या प्रकारच प्रकरण निर्णय घेत असतांनाच त्याच्यामध्ये समांतर पध्दतीन त्याची जबाबदारी निश्‍चित करुन प्रशासकीय कार्यवाही करण्याची सुध्दा मी सुचना देतो. सामान्य प्रशासन विभागाने या पध्दतीने कराव. सामान्य प्रशासनाकडेच जर या प्रकारची काही दिरंगाई होत असतील. तर लेखापरिक्षकांनी अश्या याच्यावर स्पष्ट अभिप्राय नोंदवावे की, याच्या मध्ये प्रशासकीय दिरंगाई झालेली आहे किंवा आर्थिक नुकसान झालेल आहे.जबाबदारीची जाणीव करुन देण जबाबदारी निश्‍चित करणे आणि काही प्रमाणामध्ये शिस्तभंगाची कार्यवाही करणे, जेणे करुन प्रशासनाच्या कामकाजाला अधिक गती येईल आणि शिस्त लागेल याची

खबरदारी आपण घेऊ. या दोन्ही प्रकरणामध्ये जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावरती शिस्तभंगाची कार्यवाही निश्चित होईल.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदय, याच पध्दतीने जी.एस.टी. दाखल करण्याच्या संदर्भातला सुध्दा प्रस्ताव अश्याच पध्दतीने शंकास्पद होता. तो त्यावेळेला आपण रद्द केला, ई-निविदा मागविली. अडीच लाखाच काम निव्वळ छत्तीस हजार रुपयामध्ये केले गेले. मा.आयुक्त महोदय, म्हणजे अडीच लाखाचे काम छत्तीस हजार रुपयामध्ये झाले. त्यामध्ये ट्रान्सपरन्सीं आल्यानंतर या पध्दतीने महानगरपालिकेच आर्थिक हित जोपासल जात. परंतु या कोटेशन पध्दतीने अश्या पध्दतीने मुदतवाढ देण्याचा जो प्रस्ताव आणि जो प्रकार सुरु असतो. निश्चितपणे त्याच्यामध्ये कुठेतरी वेगळयाबाबींचा संशय निर्माण होतो.

**मा.आयुक्त :-** नाही. आपण जे म्हणत आहात ते बरोबर आहे. ई-कोटेशन पध्दतीने दोन लाखापर्यंतचे व्यवहार असतील किंवा वस्तु खरेदी असेल. याची सवलत देत असतांना कायद्याचा उद्देश निश्चितपणे हा आहे की, प्रशासनाला छोट्या छोट्या गोष्टींसाठी विलंब लागु नये. छोटी कामे गतीने व्हावी.याचा अर्थ अनियमितता व्हावी किंवा महानगरपालिकेच आर्थिक नुकसान व्हाव हा निश्चितच कायदा करणाऱ्याच्या पाठमागचा हेतु नसावा. म्हणुनच ज्या वेळेला आपण हा मुद्दा उपस्थित केला होता त्यावेळेला जरी ही किमंत दोन लाखाच्या आत असली तरी सुध्दा आपण ई निविदा काढण्याचा निर्णय घेतला होता. आणि तो ई-निविदा काढण्याचा निर्णय आज योग्य ठरतो आहे. कारण पुर्वीच्या कोटेशन पध्दतीने आलेल्या दरापेक्षा खुप कमी दरामध्ये आज आपल्याला नविन कर सल्लागार उपलब्ध होत आहे. पुढच्या काळामध्ये सुध्दा वस्तु खरेदी असेल किंवा सेवांची रिक्वायमेंट असेल तो ई निविदा पध्दतीने करणे, काही ठिकाणी जर वेळेच बंधन असेल तर कोटेशन पध्दतीने करायला हरकत नाही परंतु बाजार भावाशी तुलना करुन ते दर योग्य आहे त्याची खातरजमा आणि त्याच सर्टीफिकेशन संबंधीत विभागाने केल्यानंतरच अश्या प्रकारचे दर मंजुर होतील. अश्या प्रकारच्या सुचना लेखापरिक्षकांमार्फत आणि माझ्या मार्फत आम्ही संबंधीत विभागाला देऊ.

**श्री.नितीन लढढा :-** ओके.

**मा.सभापती :-** अमित भाऊ, अमितभाऊ काळे, सुचक आणि अनुमोदक, किशोर भाऊ बाविस्कर.

**श्री.किशोर बाविस्कर :-** विषय क्र.३ मान्य आहे.

**श्री.अमित काळे :-** मान्य आहे.

**नगरसचिव :-** आदरणीय नितीन भाऊ, सर्वानुमते मंजुर आहे ना.

**श्री.नितीन लढढा :-** मंजुर आहे मंजुर.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.** २८७ **पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेतून मक्तेदार व पुरवठादार यांचे देयकातून कपात करण्यात येणारे आयकर (TDS) आयकर विभागात ऑनलाईन भरणा केलेनंतर, कर्मचाऱ्यांचे रिटर्न २४Q व मक्तेदारांचे रिर्टन २६Q आयकर विभागात ऑनलाईन दाखल करणे तसेच फार्म नं.१६ व १६A तयार करणे कामी माहे एप्रिल २०१७ ते माहे मार्च २०१८, सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता श्री.विजय एस.शेट यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

मात्र माहे एप्रिल २०२० ते माहे मार्च २०२३ या कालावधीकरिता आयकर रिटर्न, मक्तेदार, सप्लायर्स व इतर यांचे (२६Q) तसेच अधिकारी / कर्मचारी फॉर्म १६ इ.करिता सनदी लेखापाल / टॅक्स प्रॅक्टीशनर यांची नेमणूक करणेकरीता ई-निविदा प्रसिध्द करणेकरीता कार्यवाही प्रस्तावीत आहे.

त्यामुळे आयुक्त,म.न.पा.जळगांव यांचे दि.१४/१०/२०२० चे निर्देशान्वये श्री.विजय एस.शेट यांना वाढीव मुदत देणेस व वाढीव मुदतीसाठी अंदाजे रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लक्ष मात्र) खर्च अपेक्षित आहे.

माहे एप्रिल २०२० ते माहे मार्च २०२३ या कालवधीकरिता ई-निविदा प्रक्रिया सुरु आहे. Q-१, Q-२, साठी श्री.विजय शेट यांना सदर कामकाजाकरिता मुदतवाढ देणेस व वाढीव मुदतीसाठी येणारा अंदाजे रक्कम रु.१,००,०००/- मात्र चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बाविस्कर किशोर रमेश**

**अनुमोदक :- काळे अमित पांडुरंग**

**नगरसचिव :- विषय क्र. ४ :-** जळगांव शहरातील मेलेले जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे कामी १) श्री.नंदु शहादु नाडे, २) श्री.अशोक रामा सोनवणे यांची तात्पुरत्या स्वरुपात मानसेवी कामगार म्हणून मानधनावर ६ महिन्याकरिता नेमणूक करुन मुदतवाढ देणे व याकामी सहा महिन्याचा येणारा रक्कम रु.१,६८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.सभापती :-** ज्योतीताई चव्हाण, माईक ऑन करा ज्योतीताई.

**सौ. ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्या आधी आवाज येत आहे का सभापती महोदय,

**मा.सभापती :-** हो, आवाज येत आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** प्रशासनाला काही सुचना करायच्या आहेत. हे जे मेलेले जनावरे उचलणारे दोन्ही जे व्यक्ती आहे त्या दर सहा महिन्याला आपण वाढ देतो ती अकरा महिन्याची किंवा एक वर्षाची करावी. अस मी प्रशासनाला सुचविते. आणि दुसर आपण प्रभाग समिती वाईस जे मजुर आपण घेणार होतो. त्याचा ठराव आपण पास केला आहे या आधी त्या ठरावाच काय झाल. प्रत्येक प्रभाग समिती वाईस मजुर देण्याच ठरविल होत त्याचा विषय कुठपर्यंत आला त्याची पण माहिती द्यावी आणि मृत जनावरे उचलण्यासाठी अजुन एक गाडी स्पेअर मध्ये करुन ठेवावी जेणे करुन हे वाहन खराब झाले तर दुसर वाहन आपल्याकडे उपलब्ध राहिले पाहिजे. आणि आपली त्याच्यामुळे जी अडचण आहे ते दुर होईल असे मी प्रशासनाला सुचवते. प्रशासनाने त्या बद्दल माहिती द्यावी.

**श्री.नितीन बरडे :-** सभापती साहेब, सभापती साहेब,

**मा.सभापती :-** बोला नितीन भाऊ.

**श्री.नितीन बरडे :-** हे मृत जनावरे उचलणारे दोन्ही जण यांच मागच मानधन भेटल का ?

**मा.सभापती :-** या आधी तो विषय मी मांडला, आपण आता मागच्या विषयावर जेव्हा आपण चर्चा केली. वाहुळे साहेबांशी त्या संदर्भात मी बोललो ही होतो. परंतु स्थायीची मंजुरी असल्यानंतरच त्यांना देता येईल अस त्यांनी सांगितल, आणि दोन दिवसावरती मिटींग होती. मग मी म्हटल ठिक आहे. नाही तर मी त्यांना सुचना केल्या होत्या की, त्यांना त्यांच मानधन देण्यात याव. यापुर्वी देण्यात आलेल आहे अस मला वाटत. या वेळेस दिलेल नाही त्या बद्दल मी साहेबांना ही फोन केलेला होता. परंतु त्यांनी सांगितल की, स्थायी समिती मध्ये त्याची मंजुरी घेण्यात यावी.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय, मागे नितीन भाऊंनी जो विषय मांडला त्याचप्रमाणे तुम्हीपण बोललात की, दि.२५/०८/२०२० ला यांची मुदत संपत होती. जर दि.२५/०८/२०२० ला मुदत संपत आहे. तर आता हा अकरावा महिना चालु आहे. तीन महिने या लोकांनी काय केल. प्रशासनाने काय केल. जर प्राणी मेलेला आहे तो तर अस ठेवुन राखता येत नाही. तो ताबडतोब उचलाव लागत तर मग ही तरतुद पहिलेच करायला पाहिजे प्रशासनाने की, जेणे करुन या लोकांना अडचणच व्हायला नको. आताच हा विषय झाला आहे की, त्यांचे पगारपण थांबलेले आहे. आणि त्यांचे काम बंद आहे. वार्डामध्ये कोणी जर कुत्रा मेला तर तो उचलला जात नाही. ही जबाबदारी कोणाची आहे.

**मा.सभापती :-** ताई आता थोडया वेळापुर्वी आयुक्त साहेबांना आणि सभागृहाला मी अवगत केल की, असे विषय वारंवार येता कामा नये. साहेबांनी आपल्याला आश्वासन दिलेल आहे की, या विषयाशी जो कोणी संबंधीत कर्मचारी असतील अधिकारी असतील त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही किंवा दुसऱ्या काही कारवाया करता येईल. तर ते करण्याचा प्रयत्न केला जाईल.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** जस सांगितल तस व्हायला पाहिजे, नाही तर मिटींगमध्ये बोलल जात, आणि नंतर जैसे थे. प्रत्येक नगरसेवकाचा अनुभव आहे आता पर्यंतच आमचा.फक्त मिटींग मध्ये होत नंतर त्याच्यावर कुठलीच कार्यवाही केली जात नाही. ऐवढी आयुक्त साहेबांना विनंती असणार आहे.

**मा.आयुक्त :-** बेंडाळेताई आपण जे दोन मुद्दे उपस्थित केलेले आहे. आपण दिलेली पहिली मुदत ऑगस्ट अखेर पर्यंतची होती. सहाय्यक आयुक्त आरोग्याचे सांगत आहे की, त्यांना ऑगस्ट पर्यंतचा पगार दिला गेलेला आहे. सप्टेंबर ऑक्टोबर या दोन महिन्यांचे पगार बाकी आहेत. आता ही मान्यता झाल्यानंतर सप्टेंबर ऑक्टोबरचे पगार होतील मग नंतर आणि नोव्हेंबरचा पगार आपण डिसेंबरला देणार आहोत. तो रेग्युलरली होत जाईल.या पुढच्या पिरियेड मध्ये जे आपण आता चर्चा केली सभापती यांनी सुचना केल्याप्रमाणे मुदत संपण्याच्या आगोदरच तो प्रस्ताव स्थायी समिती समोर दाखल होईल याची आपण खबरदारी घेऊ. दुसरी गोष्ट की, आपण जो मुद्दा उपस्थित केला की, यांचा पगार नाही झाल्यामुळे मृत जनावरे उचलली जात नाही. परंतु आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त सांगत आहे की, यांच काम दैनंदिन चालु आहे. मृत जनावर उचलण्याची काम होत आहे.परंतु काही तांत्रिक अडचणी मुळे त्यांचे दोन महिन्याचे पगार आपण देऊ शकलो

नाही. आज मान्यता झाली की, आपण तातडीने पगार ही करु . आणि अश्या प्रकारचे मृत जनावरे जर उचलले जात नसतील तर आपण आरोग्य विभागाचे सॅनिटरी इन्स्पेक्टरांना सुचना करा तातडीने कार्यवाही होईल त्याच्यावर.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** साहेब गाडी येत नाही. मी चार वेळा कंमप्लेन्ट केलेली आहे मागच्या आठवडयात. शेवटी मजुर लाऊन इन्सपेक्टरने उचलले. आरोग्य विभागाचे माणसांकडुनच उचलले गेले. परंतु काय असतं. त्यांच्या कडे साधन नसत गाडी नसते. ते कसतरी लोमकत लोमकत घेऊन जात असतात वार्डातुन. गाडीवर म्हणा कशावर म्हणा. जर गाडी असती तर ते प्रॉपर व्यवस्थीत नेल जात असत ना.

**मा.सभापती :-** ताई, आपल्याकडे आता जे मेलेले जनावरे उचलणारे कर्मचारी आहे फक्त दोन आहे आणि शहराची लोक संख्या बघता ते खुप कमी पडतात. म्हणुन आपण त्यांची संख्या वाढवली पाहिजे.

**सौ.ज्याती चव्हाण :-** हेच मी तुम्हाला सांगत आहे सभापती महोदय, हाच विषय मांडला आहे.

**मा.सभापती :-** एकच मिनीट ताई.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मागचा ठराव झालेला आहे तसा.

**मा.सभापती :-** वाहन नसल्यामुळे ही मेलेली जनावरे उचलली जात नाही.नगरसेवकांना नागरीकांचे वारंवार फोन येत असतात. इव्हन महापौर असतील मग यांची तक्रारी महापौरांकडे, शहराच्या आमदारांकडे केली जातात. अशी वेळ येऊ नये म्हणुन आपण कामगारांची संख्या वाढवावी आणि त्याच्यात वाहनांची सुध्दा संख्या वाढवली गेली पाहिजे. आणि ज्योतीताईंना मी सांगु ईच्छितो की, आपण जी ११ महिन्याची मुदतवाढ मागीतलेली आहे. तर म.न.पा.फंडातुन केला जाणारा खर्च स्थायी त्याला फक्त १० महिन्यापर्यंत परमिशन देऊ शकते. तर एका वेळेस ६ महिन्यासाठी मुदतवाढ देऊ शकते.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदय,

**मा.सभापती :-** बोला भाऊ.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदय, या दोन्ही कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आपण धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे की, यांना कायमस्वरुपी सेवेमध्ये समाविष्ट करणेच्या संदर्भात, आणि त्या संदर्भात तसा पत्र व्यवहार आपण राज्य शासनाला सुध्दा केलेला आहे. हा वारंवार सहा सहा महिने मुदतवाढ देण्याच्या संदर्भातला प्रस्ताव येतो आणि त्यावेळेस प्रत्येक वेळी ही चर्चा होते. या दोन्ही कर्मचाऱ्यांच्या बाबतीत संपुर्ण सभागृहाला सहानुभुती आहे. परंतु त्यांच्या प्रश्नावरती कायमसेवेमध्ये समावेश करुन घेण्याच्या संदर्भात प्रशासनाला नेमकी अडचणी काय ? याबाबतची माहिती प्रशासनाने सभागृहाला अवगत करावी.

**मा.सभापती :-** भाऊ, प्रशासनाने प्रस्ताव पाठविलेला आहे. आणि त्याच उत्तर ही मिळालेल आहे मला वाटत, त्याच्यामध्ये त्यांनी सांगितलेल आहे कोणत्या अधिनियमा अंतर्गत त्यांची नेमणुक केलेली आहे. अस एक पत्र मला मिळालेल आहे. आपले नवनाथभाऊ दारकुंडे यांनी कॉपी दिलेली आहे. त्याच्या मध्ये उत्तर पण आहे आणि जो आपण प्रस्ताव दाखल केलेला होता. त्या सभेची कॉपीपण त्यांनी मला दिलेली आहे. मला वाटत आयुक्त साहेब याच्यावर उत्तर देतील.

**श्री.नितीन लढढा :-** आयुक्त साहेब त्याच्यावर संक्षिप्त उत्तर देऊन द्या. म्हणजे नेमक त्यांना न्याय देऊ शकु की नाही आपण. कारण ते बिचारे सर्वांकडे या अपेक्षा घेऊन येतात.आणि जे काम ते करत आहे मी म्हणतो कोणताही कर्मचारी करु शकणार नाही. इतक खालच्या स्तरावरच काम ते प्रामाणिकपणे करतात. त्यांना जर कधी आपण न्याय देऊ शकत नसलो, तर निश्चितपणे आपल्या मनालाही कुठेतरी या गोष्टींचा क्लेश होतो. नेमक त्यांना न्याय देण्याच्या संदर्भातली प्रशासनाची भुमिका सभागृह समोर स्पष्ट होण गरजेच आहे.

**मा.आयुक्त :-** आपण जो पाठविलेला प्रस्ताव आहे, ते आता सभापती म्हणत आहे की, त्याला शासनाने काही क्युरी किंवा त्रृटी काढुन कळविलेल आहे. त्या प्रस्तावाचा अभ्यास आम्ही करु आणि येणाऱ्या बैठकीमध्ये त्यांची अडचण काय आणि या अडचणी मधुन काही मार्ग निघु शकेल का कायदेशीर मार्गाने ? त्या बद्दल आपण महापालिका म्हणुन किंवा प्रशासन म्हणुन आपली भुमिका स्पष्ट करु. येणाऱ्या सभेमध्ये आपण या विषयावर चर्चा करु अशी माझी विनंती आहे.

**श्री.नितीन लढढा :-** आयुक्त महोदय, हे आश्वासन जवळपास ५ व्या किंवा ६ व्या आयुक्तांकडुन मिळालेल आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** बरोबर आहे. आपण स्थायी समिती सभापती होतो तेव्हा पासुन आहे हा मुद्दा.

**श्री.नितीन लढढा :-** न्याय देऊ शकणार की नाही, न्याय देऊ शकत नसेल, काही कायद्याने अडचण असेल तर त्या पध्दतीने त्यांना स्पष्ट सांगितल जाईल. परंतु जर त्यांना न्याय देण्याच्या संदर्भातली भुमिका जर प्रामाणिकपणे घ्यायची असेल मला वाटत आपण आताच दोन मिनीटात, आपला अभ्यास गाढा आहे या संदर्भात. आपण फाईल बोलवावी दोन मिनीटात तुम्हाला शासनाकडुन आलेल्या पत्राचा अनुषंगाने काय आहे की, महानगरपालिकेने आपल्या स्तरावर याच्यासंदर्भात निर्णय घ्यायचा आहे.

## वेळ ०१:१५:३५ पासुन पुढे

**आयुक्त :-** मा.नितीनभाऊ माझी विनंती आहे की आपण कागदपत्र बघुया , चर्चा करूया म्हणजे तातडीने घाईगडबडीने काही मत किंवा आपण निर्णय घेण्याच्या ऐवजी येणाऱ्या सभेमध्ये आपण सविस्तर चर्चा करू म्हणजे प्रशासनाला याच्या अडीअडचणी समजुन घेवुन आणि त्याच्या बद्दलची रिडींग बीटवीन द लाईन ज्याला आपण म्हणतो की, नेमकी शासनाची भुमिका काय आहे आणि खरोखर आपल्याला त्यांना कायम सेवेमध्ये सामावुन घेणे शक्य आहे किंवा नाही याच्याबद्दलच एक धोरण निश्चित करू . येणाऱ्या सभेमध्ये आपण चर्चा करूया म्हणजे आपल्याला काहीतरी सकारात्मक निर्णय घेवुन पुढे जाता येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आयुक्त महोदय आपण पुढच्या स्थायी समितीमध्ये या संदर्भातील संपुर्ण वस्तुस्थिती काय आहे आणि त्यांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातुन पुढे धोरणात्मक निर्णयाच्या संदर्भातील ऑलरेडी धोरणात्मक निर्णय झालेला आहे. त्यांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातुन त्यांना सरळसेवा साठी दोन पदांची निर्मीती करून अशी पदनिर्मीती असावी. त्या पध्दतीने या दोन लोकांना तातडीने न्याय देण्याच्या संदर्भातील भुमिका प्रशासनाने घ्यावी.एवढी आमची प्रशासनाला विनंती आहे.

**आयुक्त :-** जरूर आपल्या सुचनांची आम्ही अंमलबजावणी करू.

**श्री.नितीन लढ्ढा :-** थँक्यु

**सौ.ज्योती चव्हाण :-** आयुक्त साहेब नितीनभाऊंच्या प्रश्नाशी मी सहमत आहे आणि पुढच्या मिटींग मध्ये तुम्ही सदर याची पुर्ण माहिती आम्हाला उपलब्ध करून द्यावी व या दोघ कर्मचाऱ्यांना कायम कसं करता येईल . याकडे आपण लक्ष द्यावं आणि परत हा विषय एकदा स्थायी मध्ये घ्यावा. प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करते.

**मा.सभापती :-** निश्चित संबंधित विषयाचा संबंधित अधिकारी पुर्ण अभ्यास करून ठेवतील. बोला सरिता ताई सरिता ताई नेरकर

**श्रीमती.सरिता नेरकर :-** या विषयास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २८८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ३०९(१) नुसार शहरातील मेलेले जनावरांची प्रेत उचलून त्यांची विल्हेवाट लावणे महापालिकेचे कर्तव्य आहे. अर्जदार / मानसेवी कामगार श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे यांनी दि.२०/१०/२०२० रोजी अर्ज देवून शहरातील मेलेले जनावरे उचलणे कामाकरिता ६ महिने करिता मुदत वाढीचा अर्ज केलेला आहे.

तसेच श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार हे गेल्या १५ ते २० वर्षापासून ६ महिन्याचे मुदतीवर प्रत्येकी रु.१४,०००/- प्रमाणे मानधनावर दोन्ही कामगार शहरातील दैनंदिन मेलेले जनावरे उचलणेचे काम व्यवस्थित करित असून स्थायी समिती ठराव क्रं.२६० दि.२५/०८/२०२० मंजूरी अन्वये दरमहा रु.१४,०००/- मानधनावर शहरातील मृत जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहून तात्पुरती नियुक्ती करणेस मान्यता प्रदान केलेली आहे. सदरची मुदत दि.२९/०२/२०२० पासून ते पूढील ६ महिनेची दि.२५/०८/२०२० रोजी मुदत संपत असल्याने यापूढील ६ महिन्याच्या कालवधीसाठी पुन्हा दोन दिवसांचा खंड देवून दि.२८/०८/२०२० पर्यंत ते दि.२२/०२/२०२१ पर्यंत (६महिने) च्या कालावधीसाठी दोन्ही मानसेवी कामगारांची तात्पुरती नियुक्ती देणेस व दरमहा प्रति कामगार रक्कम रु.१४,०००/- याप्रमाणे मानधन अदा करणेस तसेच सहा महिनेकरिता येणारा एकूण रक्कम रु.१,६८,०००/- मात्र चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सदरील विषयासंदर्भात यापूर्वी स्थायी समिती सभेत प्रत्येक प्रभाग समिती निहाय एक मजुर लावणे कामी ठराव पारित करण्यात आलेला असून तशी सखोल चर्चा झालेली आहे. त्यानूसार प्रभाग समिती क्रं.१ ते ४ साठी प्रत्येकी एका मजूराची नियुक्ती करण्यात यावी व मेलेले जनावरे उचलून नेण्यासाठी पूर्वीच्या वाहना व्यतिरीक्त एक छोटे स्वतंत्र वाहन व एक ड्रायव्हर सुध्दा उपलब्ध करुन देण्यांत यावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**अनुमोदक :- नेरकर सरिता अनंत**

**नगरसचिव :- विषय क्र. ५ :-** मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत मनपाच्या डांबरी रस्ते दुरुस्ती कामी ०३ ट्रॅक्टर व ०९ मजुर पुरवठा करणे कामी मक्तेदार न्यु ज्वाला सिक्युरिटी फोर्स यांचे रक्कम रु.२२५०/- प्रति दिन प्रति ट्रॅक्टर व रक्कम रु.५४५/- प्रति दिन प्रति मजुर दरास तसेच १२ महिन्या करीता एकूण येणारा रक्कम रु.४१,९५,८००/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषय क्रं. ५ ला सुचक आहे. सदर प्रस्ताव मान्य आहे.

**मा.सभापती :-** किशोर भाऊ, किशोर भाऊ बाविस्कर

**श्री. किशोर बाविस्कर:-** सदर प्रस्तावाला माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.सभापती महोदय,

**मा.सभापती :-** बोला भाऊ, आवाज येतोय तुमचा

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो येतोय मा.सभापती महोदय, याच्या संदर्भात माझी एकच दुरूस्ती करण्याची भुमिका आहे कि हे ट्रॅक्टर आणि मजुर हे आपण शहरातील रस्ते खड्डे बुजविण्याच्या संदर्भात घेण्याच्या संदर्भात आपण ह्या प्रस्तावाच्या अनुषंगाने एकंदरीत परिस्थिती निदर्शनाला येतेय आणि या अनुषंगाने हा प्रस्ताव ज्या वेळेला सुरूवात करण्यात आलेली होती. त्यावेळेला जळगांव शहर महानगरपालिकेकडे आपले जे वाहने बांधकाम विभागाचे जे ट्रॅक्टर होते ते आरोग्य विभागाकडे वर्ग करण्यात आलेले होते. परंतू आता वॉटरग्रेसला मक्ता दिल्यानंतर महानगरपालिकेचे ट्रॅक्टर हे पुन्हा बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आलेले आहे. हा एक भाग , दुसरा भाग की खड्डे बुजविण्याचे काम आपण निविदा प्रक्रीया राबवुन हे मक्तेदारांच्या माध्यमातुन राबविण्याच्या संदर्भातील भुमिका ठरविलेली आहे. तर त्यामुळे मला अस वाटत की आज परिस्थिती अशी आहे आपल्याकडे वाहनं उपलब्ध आहेत परंतू वाहनांवर कर्मचारी उपलब्ध नाहीयेत. तर आज जी गरज जी आहे ती वाहनांची गरज नसुन आज आपले वाहन चालक रिकामे आहेत.वाहने रिकामे आहेत. फक्त त्याच्यावर मजूर नसल्याकारणाने पुर्ण क्षमतेने उपयोग करून घेता येत नाहीये. तर मला वाटते की हे जे तीन नविन ट्रॅक्टर जे आहेत याच्यावर होणारा खर्च हा निष्कारण खर्च आहे आणि मनपाच्या पैशांचा अपव्यय आहे. तर या भाड्याने ट्रॅक्टर लावण्याच्या संदर्भातील विचार हा पुनश्च सभागृहाने एकवेळा करावा.अन्यथा वर्षाला २० लाख रूपये हे पाण्यात जातील. मा.आयुक्त महोदय आपण सुध्दा या संदर्भातला विचार करावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नितीनभाऊ या विषयामध्ये ज्या तिन ट्रॅक्टरचा विषय आहे मागे पण हे टेंडर तसेच होते आपले जे बांधकाम विभागाच्या युनिट चे ट्रॅक्टर जे आहे ते आठ आहेत.प्रत्येक युनिटला ट्रॅक्टर नसल्यामुळे त्याकरीता तिन ट्रॅक्टर जरूरी आहे त्या करीता ते मक्तेदाराचे ट्रॅक्टर असल्यास आपल्याला ते प्रभागामध्ये कुठे ना कुठे ईमर्जन्सी देता येतात . त्याकरीता या तिन ट्रॅक्टर ची आवश्यकता आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नवनाथ भाऊ.

**मा.सभापती :-** नितीन भाऊ,

**श्री.नितीन लढ्ढा :-** बोला बोला भोसले साहेब

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** मा.सभापती , सन्मा नगरसेवक , मा.नितीनभाऊ जे म्हणताहेत ते शहर अभियंता म्हणून त्याच्यात अभिप्राय नमुद केलेले आहेत. कारण ट्रॅक्टर आरोग्य विभागाकडे गेले होते त्या कारणास्तव वाहन भाडयाने लावण्याचा विषय आलेला होता. पण आज वाहनांची गरज नाहीये आपल्याला जर भविष्यात लागले तर त्याचे दर निश्चित करून घ्यावे या अनुषंगाने तो प्रस्ताव दिलेला आहे.वाहनांची आवश्यकता नाहीये आपल्याला फक्त आपण मजुर घेणार आहोत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब मला एक सांगा आपल्या बांधकामच्या युनिट चे ट्रॅक्टर किती आहे ?

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** बांधकाम विभागाचे आठ ट्रॅक्टर आहेत आपल्याकडे आज

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** युनिट किती आहेत आपले ?

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** आठ युनिट आहे आपले.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आठ युनिट आहेत कि बारा युनिट किती आहेत आपले बांधकामचे ?

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** आजच्या तारखेत आठच युनिट आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नाही ट्रॅक्टर तर आठच आहेत ना युनिट किती बारा आहेत का ?

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** पुर्वी बारा होते आता आठच आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** युनिट ही आठ आहेत आणि ट्रॅक्टरही आठ आहेत. म्हणजे प्रत्येक युनिट ला एक ट्रॅक्टर उपलब्ध होवू शकते आपल्याकडे

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** तिन ट्रॅक्टर आपण सद्या अतिक्रमण विभागाकडे वर्ग केलेले आहेत. अतिक्रमण विभागासाठी .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हा , नितीनभाऊ असे प्राब्लेम येतात त्याकरीता हे तिन ट्रॅक्टर जे आहेत जरूरी आहे. ईर्मजन्सी आपण असे आहे . कारण काही ट्रॅक्टर काढुन आपण ईर्मजन्सी पाठवतो. म्हणजे दसरा राहीला, दिवाळी राहीली , मटेरियल उचलायचे म्हटले त्याकरीता ते जरूरी आहे. कारण काय आहे बांधकामचे ट्रॅक्टर आपले इंजिनियर लोकं दुसऱ्या युनिट ला टाकतात. मग दुसऱ्या युनिटला आपल्याला ट्रॅक्टर भेटत नाही . त्याकरीता जरूरी आहे.

**श्री. किशोर बाविस्कर:-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** किशोर भाऊ बोला.

**श्री. किशोर बाविस्कर:-** सभापती महोदय, नितीनभाऊंनी जे विचारले आपण फक्त हे ट्रॅक्टरचे दर मंजुर करून घेतोय

**श्री.नितीन लढ्ढा :-** ओके , ठिक आहे ट्रॅक्टरचे दर मंजुर करून ठेवा. परंतू जिथे आवश्यकता असेल तशाच परिस्थितीत त्या ट्रॅक्टरांचे हे करा. एखादेवेळेस आपातकालीन परिस्थिती असेल त्यावेळेला भाडयाने लावण्या बद्दल काही दुमत नाहीये. परंतू वर्षाला विस लाख रूपये खर्च करायचा आणि आपल्या महानगरपालिकेचे जे आठही ट्रॅक्टर आहेत. नविन ट्रॅक्टर असल्याने चांगल्या कंडीशनचे ट्रॅक्टर आहेत. त्याला दोन शिफ्ट मध्ये सुध्दा तुम्ही काम करू शकतात. कारण तुमच्या कडे वाहनचालकांची संख्या आवश्यकतेपेक्षा जास्त आहे. कारण आपण या सगळया ८५ घंटागाडया आणि जवळपास १०० ते १२५ वाहन जी आहेत ही आरोग्याच्या मक्तेदाराकडे वर्ग केलेली आहेत. तर त्याच्यामुळे आपल्याकडे अतिरीक्त ड्रायव्हर असतांना आपल्याकडे जे आठ ट्रॅक्टर आहेत. याला तुम्ही दोन शिफ्टमध्ये सुध्दा काम करू शकतात हि परिस्थिती आहे. म्हणजे विनाकारण हा २० लाख रूपयांचा खर्च अनाठायी खर्च करण्यामध्ये अवचित्य नाही असे मला वाटते.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ठिक आहे भाऊ मंजुर करून ठेवा . मग अधिकारी लोक करतील पुढची कार्यवाही .

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ठिक आहे त्या दृष्टीकोनातुन निर्णय घ्या.

**श्री. किशोर बाविस्कर:-** या विषयाला अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २८९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत मनपाच्या डांबरी रस्ते दुरुस्ती कामी ०३ ट्रॅक्टर व ०९ मजुर पुरवठा करणे कामास आयुक्त यांनी दि.१५/०७/२०२० अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त म.न.पा. यांचे दि.१५/०७/२०२० च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई-निविदा सुचना क्रं.४२/१ सन २०२०-२१ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा./३१५ दि.१७/०८/२०२० चे पत्रान्वये दै.दिव्यमराठी या वर्तमान पत्रात दि.१८/०८/२०२० रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणे करीता दि.१७/०८/२०२० ते दि.२७/०८/२०२० पर्यंत मुदत देण्यात आली होती. मुदतीत संगणकाव्दारे https://mahatenders.in वर दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांचे फोल्डर क्रं.१ उघडले असता ०२ मक्तेदारांचे उक्त कामाचे प्राप्त झालेले ई-निविदा कागदपत्रांचे छाननी केली असता शहर अभियंता यांचे दि.०१/१०/२०२० च्या टिप्पणीत नमूद केल्यानुसार कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट १९७० नुसार लेबर परवाना (नोंदणी प्रमाणपत्र) सर्वात कमी आलेल्या मक्तेदार यांच्या कडून यांनी कामाचा कार्यादेश प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या आत सादर करण्याच्या अटीवर दोन्ही मक्तेदार यांचे ई-निविदाचे दराबाबतचे फोल्डर नं.२ दि.१३/१०/२०२० रोजी उघडले असता त्यात खालील प्रमाणे दर आले.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | संख्या | दर | अपेक्षीत खर्च एका दिवसा करीता | एका महिन्याकरीता एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | न्यु ज्वाला सिक्युरिटी फोर्स | ०३ ट्रॅक्टर | २४९९/- प्रति दिन प्रति ट्रॅक्टर | ७४९७/- | २२४९१०/- |
| | | ०९ मजुर | ५९९ प्रति दिन प्रति मजुर | ५३९१/- | १६१७३०/- |
| २ | शिवा सिक्युरिटी & लेबर सर्व्हीसेस | ०३ ट्रॅक्टर | ३०००/- प्रति दिन प्रति ट्रॅक्टर | ९०००/- | २७००००/- |
| | | ०९ मजुर | ७०० प्रति दिन प्रति मजुर | ६३००/- | १८९०००/- |

मक्तेदार न्यु ज्वाला सिक्युरिटी फोर्स यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा रक्कम रु.२४९९/- प्रति दिन प्रति ट्रॅक्टर व रक्कम ५९९/- प्रति दिन प्रति मजुर दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटी साठी सा.बा.पत्र क्रं.४८३ दि.१६/१०/२०२० अन्वये दरा बाबत दि.१९/१०/२०२० दु.४.०० वाजता बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीस येवून त्यांनी दि.२२/१०/२०२० रोजी सा.बा.आ.क्रं.१५४६ दि.२२/१०/२०२० अन्वये सदरचे काम रक्कम रु.२२५०/- प्रति दिन प्रति ट्रॅक्टर व रक्कम रु.५४५/- प्रति दिन प्रति मजुर दरात करण्याची लेखी संमती दिली आहे. त्यानुसार ०३ ट्रॅक्टर साठी एका महिन्यासाठी रक्कम रु.२०२५००/- मात्र व ०९ मजुर साठी एका महिन्यासाठी रक्कम रु.१,४७,१५०/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम हे १२ महिन्याकरीता असल्याने त्याकरीता खालील प्रमाणे अपेक्षीत खर्च आहे.

| संख्या | वाटाघाटी अंती निश्चित केलेले दर | अपेक्षीत खर्च एका दिवसा करीता | एका महिन्याकरीता एकुण खर्च | १२ महिन्याकरीता एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| ०३ ट्रॅक्टर | २२५०/- प्रति दिन प्रति ट्रॅक्टर | ६७५०/- | २०२५००/- | २४३००००/- |
| ०९ मजुर | ५४५ प्रति दिन प्रति मजुर | ४९०५/- | १७७१५०/- | १७६५८००/- |
| | | | एकुण रक्कम रु. | ४१९५८००/- |

वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे १२ महिन्या करीता रक्कम रु. ४१९५८००/- मात्र खर्च येणार आहे. परंतु या पूर्वी मक्तेदारास देण्यात आलेल्या दि.२४/०७/२०१९ च्या कार्यादेशा नुसार ट्रॅक्टर वाहन ट्रॉली, वाहन चालक व इंधनासह रक्कम रु.२०५०/- प्रति दिन व मजुर पुरविणे कामी प्रति मजुर प्रति दिन रक्कम रु.५२०/- मात्र दर होते.

ट्रॅक्टर वाहन पुरवठा बाबत सन २०२०-२१ चे डी.एस.आर. नुसार रक्कम रु.३३०/- प्रति तास असा दर नमूद आहे. त्या नुसार रक्कम रु.२६४०/- प्रति दिन (आठ तासाकरीता) असे दर नमूद आहेत. सदर निविदा प्रसिध्द केली त्यावेळी सार्व.बांधकाम विभाग कडील सर्व ट्रॅक्टर वाहन आरोग्य विभागाकडे वर्ग झालेली होती. परंतु सदयास्थितीत सदर ट्रॅक्टर वाहन बांधकाम विभागाकडे परत आलेली असल्याने आज रोजी मक्तेदार कडून ट्रॅक्टर वाहन घेण्याची आवश्यकता नाही. परंतु भविष्यातील विचार करता दर मंजुर करुन घेणे योग्य होईल.

सन २०२०-२१ चे डि.एस.आर. नुसार मजुराचा दर रुपये ५६०/- प्रति दिन नमुद आहे. मक्तेदाराशी वाटाघाटी समीतीने चर्चा करुनच मजुर पुरविण्याचा दर रक्कम रु.५४५/- प्रति मजुर प्रति दिन व ट्रॅक्टर वाहन ट्रॉली, चालक व इंधनासह पुरविण्याचा दर रक्कम रु.२२५०/- निश्चित केला व त्या नुसार मक्तेदाराने लेखी पत्र सादर केलेले असुन सदर दर हे सन २०२०-२१ चे डि.एस.आर.पेक्षा कमी असल्याने मक्तेदार न्यु ज्वाला सिक्युरिटी फोर्स यांचे वाटाघाटी अंती दिलेले दर स्विकृत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :-** १६ **प्रतिकुल मते :-** ००
**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**
**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्र. ६ :-** मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत मनपाच्या सार्व.बांधकाम विभागा अंतर्गत दैनंदिन कामासाठी आवश्यक मजुर मक्तेदारा मार्फत लावणे कामी मक्तेदार न्यु ज्वाला सिक्युरिटी फोर्स यांचे रक्कम रु.५४५/- प्रति दिन प्रति मजुर दरास तसेच १२ महिन्या करीता एकूण येणारा रक्कम रु.४७,०८,८००/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषय क्रं. ६ जो प्रशासनाकडून आलेला आहे त्याला मान्यता आहे सुचक म्हणुन .

**श्री.नितीन लढ्ढा :-** मागच्या विषयामध्ये सुध्दा आपण त्याच पध्दतीने ट्रॅक्टर आणि मजूर घेतोय. तिथे तिन ट्रॅक्टर आणि त्याच्यावर नऊ मजूर घेत होतो म्हणजे मजुरांचा हा डबल डबल विषय येतो ना

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** भाऊ पहिला विषय जो आहे तो डांबरी रस्ते

**श्री.नितीन लढ्ढा :-** ट्रॅक्टर आणि मजुर

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** भाऊ पहिला विषय जो आहे तो डांबरी रस्ते दुरूस्ती करण्यासाठी जे मजुर लागतात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** आणि आता हा ६ नंबरचा जो विषय आहे. आपले जे आठ युनिटवर तिन मजुरांचा विषय आहे याच्यात

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे म्हणजे ट्रॅक्टरशी रिलेटेड गरज पडेल त्यावेळेलाच ते मजुर येतील ना

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** नाही प्रत्येक युनिटला तिन मजुर

**श्री.नितीन लढ्ढा :-** अच्छा आपल्या आठ ट्रॅक्टर वर ते तिन मजुर

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** हो

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे २४ मजुरांचा मक्ता त्याच्यासाठी आहे.

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** हो २४ मजुरांचा हा विषय वेगळा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा म्हणजे आठ ट्रॅक्टरच्या अनुषंगाने आहे आणि एका ट्रॅक्टर वर तिन मजुर साठी स्वतंत्र मक्ता आहे.

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** हो स्वतंत्र आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे त्याची गरज पडल्यानंतरच आपण ते घेणार आहोत

**मा.सभापती :-** नितीनभाऊ

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** युनिटला ट्रक्टर आहेत पण मजुर नाहीत आज आपल्याकडे

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही नाही

**मा.सभापती :-** नितीनभाऊ याच्या बद्दल आपल्याकडे

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपल्याकडे आवश्यकता आहे याच्याबद्दल काही दुमत नाहीये

**मा.सभापती :-** नितीनभाऊ आपल्याकडे जे आठ ट्रॅक्टर आहेत आज पण मजुर नाहीयेत आपली वाहन उभी आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे. मान्य आहे. मान्य आहे

**मा.सभापती :-** त्याच्यासाठी आपल्याला झाडांच्या फांद्या तोडलेल्या असतात इतर काही कामे असतात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य आहे राजु भाऊ मान्य आहे.

**मा.सभापती :-** हो तर त्या आठ ट्रॅक्टरवर आपल्याला चोविस मजुर घ्यायचे आहेत.प्रत्येक ट्रॅक्टर वर तिन मजुर या प्रमाणे

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य आहे काही हरकत नाही

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ६ व्या नंबर वरच्या विषय सुचक म्हणुन माझ नांव

**मा.सभापती :-** किशोर भाऊ , किशोर भाऊ बाविस्कर

**श्री. किशोर बाविस्कर:-** सदर प्रस्तावाला माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** आदरणीय नितीनभाऊ विषय क्रं. ५ आणि ६ सर्वानुमते मंजुर आहे ना ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो हो.

**नगरसचिव :-** ठिक आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २९० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत मनपाच्या सार्व.बांधकाम विभागा अंतर्गत दैनंदिन कामासाठी आवश्यक मजुर मक्तेदारा मार्फत लावणे कामास आयुक्त यांनी दि.०४/०६/२०२० अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त म.न.पा. यांचे दि. ०४/०६/२०२० च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई-निविदा सुचना क्रं.४२/२ सन २०२०-२१ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा./३१५ दि.१७/०८/२०२० चे पत्रान्वये दै.दिव्यमराठी या वर्तमान पत्रात दि.१८/०८/२०२० रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणे करीता दि.१७/०८/२०२० ते दि.२७/०८/२०२० पर्यंत मुदत देण्यात आली होती. मुदतीत संगणकाव्दारे https://mahatenders.in वर दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२

दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांचे फोल्डर क्रं.१ उघडले असता ०२ मक्तेदारांचे उक्त कामाचे प्राप्त झालेले ई-निविदा कागदपत्रांचे छाननी केली असता शहर अभियंता यांचे दि.०१/१०/२०२० च्या टिप्पणीत नमूद केल्यानुसार कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट १९७० नुसार लेबर परवाना (नोंदणी प्रमाणपत्र) सर्वात कमी आलेल्या मक्तेदार यांच्या कडून यांनी कामाचा कार्यादेश प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या आत सादर करण्याच्या अटीवर दोन्ही मक्तेदार यांचे ई-निविदाचे दराबाबतचे फोल्डर नं.०२ दि.१३/१०/२०२० रोजी उघडले असता खालील प्रमाणे दर आले.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | संख्या | दर | अपेक्षीत खर्च एका दिवसा करीता | एका महिन्याकरीता एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | न्यु ज्वाला सिक्युरिटी फोर्स | २४ मजुर | ५९९ प्रति दिन प्रति मजुर | १४३७६/- | ४३१२८०/- |
| २ | शिवा सिक्युरिटी & लेबर सर्व्हीसेस | २४ मजुर | ७०० प्रति दिन प्रति मजुर | १६८००/- | ५०४०००/- |

मक्तेदार न्यु ज्वाला सिक्युरिटी फोर्स यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा रक्कम रु.५९९/- प्रति दिन प्रति मजुर दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटी साठी सा.बा.पत्र क्रं.४८२ दि.१६/१०/२०२० अन्वये दरा बाबत दि.१९/१०/२०२० दु.४.०० वाजता बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीस येवून त्यांनी दि.२२/१०/२०२० रोजी सा.बा.आ.क्रं.१५४५ दि.२२/१०/२०२० अन्वये सदरचे काम रक्कम रु.५४५/- प्रति दिन प्रति मजुर दरात करण्याची लेखी संमती दिली आहे. त्यानुसार २४ मजुर साठी एका महिन्यासाठी रक्कम रु.३९२४००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम हे १२ महिन्याकरीता असल्याने त्याकरीता खालील प्रमाणे अपेक्षीत खर्च आहे.

| संख्या | वाटाघाटी अंती निश्चित केलेले दर | अपेक्षीत खर्च एका दिवसा करीता | एका महिन्याकरीता एकुण खर्च | १२ महिन्याकरीता एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| २४ मजुर | ५४५ प्रति दिन प्रति मजुर | १३०८०/- | ३९२४००/- | ४७०८८००/- |
| | | | एकुण रक्कम रु. | ४७०८८००/- |

वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे १२ महिन्या करीता रक्कम रु. ४७०८८००/- मात्र खर्च येणार आहे. त्यानुसार मक्तेदार न्यु ज्वाला सिक्युरिटी फोर्स यांचे वाटाघाटी अंती दिलेले दर स्विकृत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्र. ७ :-** PMAY अंतर्गत नियुक्त मानधनावरील एकुण ०४ कर्मचारी पैकी पुनर्नियुक्ती करीता प्राप्त ०२ कर्मचारी यांना पुढील ११ महिन्यांकरीता पुनर्नियुक्ती देणे तसेच याकामी शासनामार्फत मानधन अदा करणेसाठी निधी प्राप्त होई पावेतो या ०२ कर्मचाऱ्यांना दरमहा प्रत्येकी ३५,०००/- रुपये मानधन हे मनपा निधीतून देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.सभापती :-** ज्योती ताई माईक चालु करा.

**सौ.ज्योती चव्हाण :-** हो मा.सभापती महोदय , प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्याआधी शहर अभियंता यांचा जो प्रस्ताव आहे . त्यांनी त्याबद्दल थोडी माहिती द्यावी सभागृहाला त्यांच जे म्हणणं आहे त्यांनी ते मांडुन त्यानुसार आमचा हा प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** सदरचे जे कर्मचारी आहेत ते मानधनावर आहेत.यांच अनुदान आपल्याकडे शासनाकडून प्राप्त होत असत.

**सौ.ज्योती चव्हाण :-** ओके.

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** तर सध्या त्यांच अनुदान आलेले नाहीये तर अनुदान येईपर्यंत म्हणजे मार्च पर्यंत त्यांना मुदतवाढ देण्यात यावी असा प्रस्ताव दिलेला आहे.आणि त्यांचा जो पगार आहे सध्या तो मनपा फंडातुन देण्यात यावा आणि जेव्हा शासनाचे अनुदान येईल तेव्हा ते अनुदान मनपा फंडाकडे वर्ग करण्यात येईल

**सौ.ज्योती चव्हाण :-** बर , प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आणि सदर जे दोन व्यक्ती येत नाहीयेत त्या दोन व्यक्तींची गरज आहे का आपल्याकडे आता ? दोन कर्मचारी यांची

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** ते जे दोन कर्मचारी आहेत त्यांच्याने आपल्या कामावर काही फरक पडत नाहीये आजच्या तारखेत आपल्याला या दोन

**सौ.ज्योती चव्हाण :-** बर , आपल्याला जर गरज असेल तर त्यांची परत नियुक्ती करण्यात यावी अश्याही सुचना मी देते प्रशासनाला जर गरज असेल तर कारण ते शासनाचे पद आहेत ना  दोन्ही पण

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** त्यावेळेला आपल्याला स्वतंत्र करावे लागेल.

**सौ.ज्योती चव्हाण :-** बर , आवश्यकतेनुसार तुम्ही त्याचा पाठपुरावा करा म्हणजे जशी गरज असेल तसे शासनाचे पद आपल्याला भरता येतील तर तसा पुढच्या वेळेस प्रस्ताव सादर करा.

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** चालेल

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय मला याच्यामध्ये काही बोलायचे आहे. विषय असा आहे की मागे हे जे चार लोक दिलेले होते . त्यांनी मागे त्यांच्या पगारानुसार काम केलेय का ? किती मंजुरात घेतलेय काय काय काम करून घेतले आहे. याची सविस्तर माहिती देतील का सोनगीरे साहेब?

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** नमस्कार , आपण उमेदवारांची निवड करण्यासाठी जाहीर प्रक्रीया राबवुन त्यांचा ईटरव्ह्यु घेवुन आपण ती चार पद भरलेली होती. त्यामध्ये एक पद हे आर्कीटेक्ट चे होते , दुसरे एम.आय.एस स्पेशालीस्ट चे होते , तिसरे सिव्हिल इंजिनियरचे होते आणि चौथे सोशल वर्क स्पेशालीस्ट होते . त्यापैकी सोशल वर्क स्पेशालीस्ट जे होते आणि आर्कीटेक्ट जे होते हे दोघे जण काम सोडुन निघुन गेलेले आहेत. त्यांनी एकाने रजेचा अर्ज दिलेला होता आणि त्यांच्या कामाच्या बाबतीत बोलायच जर झाल तर आपण ज्या वेळेला आपण हा टेक्नीकल स्टाफ निर्माण केला त्यावेळेला आपल्या पंतप्रधान आवास योजनेची शहरामध्ये जे काम चालु होतं त्याच्या कामाची गती वाढवण्या संदर्भात आणि योजनेच्या परिपुर्तीच्या संदर्भात त्या लोकांनी हे सगळे टेक्नीकल लोकं होते. त्यामुळे त्यांनी चांगल काम केलेलं आहे. लोकांना या योजनेची माहिती देणे. त्यांच हे अपलोड करणे , ऑनलाईन प्रक्रीया राबविण आणि त्यांना नियमानुसार काम करण बंधनकारक करणं या सगळया गोष्टी या चारही लोकांनी सांभाळलेल्या होत्या. आर्कीटेक्ट जे होते ते नकाशा तयार करून प्रस्ताव तयार करत होते ते पण त्यांनी काम केले आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** त्याच्यामध्ये दोन लोकं होते एकाने राजीनामा दिला एक कामावर येत नाही तर हे किती दिवस झाले ते कामावर नव्हते.

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** ते मे पर्यंत काम केलयं त्यांनी आणि जुन पासुन एकाने राजीनामा दिला आणि एक नागपुरचा होता त्याने फोन करून सांगीतले होते की कोरोना मुळे तो सध्या काही येवु शकत नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आता ते गेले तर मग त्यांच काम कोण पाहतय आता

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** नाही आता ॲक्चुअली काय झाल होत भाऊ जसा आपल्या जळगांव शहरामध्ये जसा कोरोनाचा प्रसार वाढला . तर आपल PMAY  च काम सुध्दा थांबलेल होत. कामाची गती खुप कमी झालेली होती . परंतु हे जे दोन लोक होते आणि तो आर्कीटेक्ट तिसरा हे जे लोक होते यांनी कोरोनाचे देखील काम केले होते. कलेक्टर ऑफीस मध्ये जावुन ती जी कोरोना ची जी माहिती भरायची होती त्या संदर्भात देखील त्यांनी म.आयुक्त सरांच्या सुचनेनुसार त्यांना ते काम दिल व त्यांनी ते काम प्रामाणिकपणे केलेल आहे आणि आरोग्य विभागाच्या डिपार्टमेंट मध्ये त्यांनी जावुन आरोग्य विभागाची जी कोरोनाशी संबंधित जी माहिती होती ते भरण्याच काम देखील त्यांनी केलेल आहे आणि ते जरी कोरोनाच्या पिरीएड मध्ये PMAY  च काम कमी होत तर त्यांनी इतरत्र काम करून त्याची भर काढुन दिलेली आहे. त्यामुळे आपण त्यांच्याकडुनच ते काम करून घेतोय .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ठिक आहे सर

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** भविष्यात जर समजा काम वाढले तर ते दोन पद भरण्याच्या संदर्भात आपण रिपोर्टींग करू शकतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आमच एवढच म्हणण आहे वरून केंद्र सरकार हि योजना राबवता आहेत पण पंतप्रधान आवास योजनेच तुम्ही लोक सुध्दा काम करताहेत. पण ज्या लोकांना अडचणी येतात. काय अडचणी फोन केले पाहीजे . कोणते प्लॅन मंजुर आहे. कोणते काय आहे कोणाला काय निधी आहे. हे व्यवस्थित त्यांना माहिती हे लोकं पुटअप करत असतात बरोबर आहे.

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** होय

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तर त्या लोकांना हे द्या तुम्ही वॉर्निंग द्या की लोकांपर्यंत सगळ व्यवस्थित सुविधा दिल्या गेल्या पाहीजे या गोष्टी साठी पाठपुरावा करा लवकरात लवकर

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** नक्की नक्की

**श्री.नितीन लढ्ढा :-** सोनगीरे साहेब या संपुर्ण योजनेचा मागील दोन वर्षामध्ये किती लाभार्थींना लाभ झाला

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** अच्छा आता भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्या संदर्भात

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** याच्या संदर्भात थोडक्यात सांगायच म्हंटल की आपण जशी योजना सुरू केली. त्यावेळेला टिपीकल चेल्ड आपण तयार केलेला नव्हता आणि आपण हि प्रक्रीया राबवत असतांना लोकांकडून फॉर्म भरून घेण , घरोघरी जावुन सर्वेक्षण करण , झोपडपट्टीचे सर्वेक्षण करणं , लोकांना या योजनेची माहिती देणं हि सर्व काम जी आपण केली त्या अंतर्गत जवळ जवळ २२ हजार लोकांचे अर्ज आपल्याकडे प्राप्त झाले आहेत. याच्यामध्ये चार प्रकारच्या कॅटेगीरी आहेत. तर सर्वात जास्त जे अर्ज प्राप्त झाले आहेत ते AHP म्हणजे अकॉर्डेबल हाऊसींग स्वत:चे स्वमालकीची जमीन त्यांच्याकडे नाही अश्या लोकांचे खुप मोठया संख्येने आपल्या जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये आहे आणि तो वर्ग बघता त्यांच्यासाठी आपण आपल्या जमीनीवर घर बांधुन देण हा एकच पर्याय होता आणि BLC जो घटक आहे तो चांगल्या प्रकारे काम होतय त्यामध्ये लोकांना आपल्या अनुदानही शासनाने पाठवुन दिले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सोनगीरे साहेब किती लाभार्थी तयार झाले आणि किती लाभार्थींना प्रत्यक्ष या योजनेचा लाभ मिळाला

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** त्याच्यामध्ये प्रत्यक्ष लाभार्थी जे आहेत जवळ जवळ १५४ लाभार्थी असे आहेत की ज्यांना आपण विविध टप्प्यांमध्ये अनुदान / पैसे वाटप केलेले आहे

**श्री.नितीन लढ्ढा :-** १५४ लोकांना

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** वाटप केलेले आहे , ५ कोटी अनुदान प्राप्त झालेल होत त्यापैकी आपण सव्वादोन कोटी अनुदान आपण वाटप केलेल आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ५ कोटी अनुदान केव्हा प्राप्त झालेल होत ?

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** आपल्याला सव्वापाच कोटी अनुदान दोन टप्प्यात प्राप्त झालेल होत . जसे जसे आपले डिपीआर मंजुर होतात भाऊ मंत्रालयातुन ते डिपीआर मंजुर झाले की त्या अनुषंगाने तेही आपल्याला टप्याटप्याने आपल्याला पैसे देतात आणि त्याची युसी आपल्याला इकडुन पाठवावी लागते . कमिशनर साहेबांच्या स्वाक्षरीने ती माहिती आपण गव्हर्नमेंटला देतो की आता एवढा पैसा खर्च झाला एवढा शिल्लक आहे. मग पुढच्या जर पैशांची आवश्यकता असेल आपण जर मागणी केली तर ते आपल्याला पैसे उपलब्ध करून देतात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला एक सांगा ५ कोटी मधुन एक कोटी ऐंशी लाखाच्या आसपास अनुदान वितरीत झाल अस आपल म्हणणं आहे.

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** हो

**श्री.नितीन लढ्ढा :-** तर हे ५ कोटी अनुदान केव्हा प्राप्त झालेल होत महापालिकेला ?

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** हे ५ कोटी रूपयांच अनुदान दुसरा टप्पा जो मिळाला होता आपल्याला हा या वर्षाच्या जानेवारी महिन्यामध्ये मिळाला होता. पहिला टप्पा जो होता.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जानेवारी मध्ये

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** हो

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग तरी सुध्दा अनुदान खर्ची पडण्याच्या संदर्भातील उदासीनता काय आहे?

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** याच्यामध्ये

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे लाभार्थी शोधण्यामध्ये आपण कुठे कमी पडतोय का? कि जेव्हा केंद्र शासनाच्या चांगल्या योजना आहेत. गरीबांना त्याच्या संदर्भातील लाभ आपण उपलब्ध करून देवु शकतो. तरीसुध्दा अनुदान वेळेमध्ये आपल्याकडुन खर्ची पडत नाही . याची कारण काय आहेत.

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** हो याला काही कारण आहेत भाऊ याच्यात सर्वात पहिल कारण हे आहे की लोक ज्यावेळेला आपल्याकडे फॉर्म भरायला येतात. तर याच्यात तसे यापुर्वी नगरपालिकेने असे मोफत घरकुल दिलेले आहेत

तसेच आपल्याला मोफत घर मिळेल. लोकांची अपेक्षा ती असते परंतू PMAY मध्ये अकॉर्डेबल हाऊसींग ची जी स्कीम आहे त्याच्यामध्ये अडीच लाखाचा हिस्सा शासन आपल्याला देत आणि उर्वरीत पैसा हा त्या लाभार्थीने भरायचा आहे. तसेच BLC  घटकामध्ये त्याने घर जे बांधायच आहे. त्या घरासाठी आपण त्याला चार टप्प्यामध्ये अडीच लाख रूपये देतो. जसे त्याच्या घराचे बांधकाम होईल ओटा, लिटींल लेव्हल , स्लॅब , प्लॅस्टर आणि कंप्लीशन असे चार टप्प्यात त्याला पैसे देतो आणि ते आपण अडीच लाखच देतो आणि वरचा जो पैसा आहे तो त्याला स्वत: लावायचा आहे. तर आपल्याला हि मेन एक अडचण आहे. दुसरी जी अडचण आहे आपल्याला स्वत:च्या जागेवर जे घरकुल बांधायच आहे. त्याच्याबद्दलही मागे सभागृहाला सांगीतले होते की आपण ८१६ घरांचा प्रस्ताव जो आहे तो आपला मंजुर आहे राज्य शासन, केंद्र शासनाकडुनही मंजुर आहे. आपण त्याची निविदा प्रक्रीयाही राबवली होती परंतू त्याला पाहीजे तसा प्रतिसाद न मिळाल्याने आता आपण म्हाडा कार्यालयाशी संपर्क करून तो प्रस्ताव म्हाडा थ्रु राबविण्याचा त्यांनी तत्वत: संमती दिली आहे. त्यासाठी आपल्याला एक महासभेचा ठराव करायचा आहे . येणाऱ्या महासभेत तो प्रस्ताव ठेवण्याचा मी प्रयत्न करतोय त्याच्या अनुषंगाने

**श्री.नितीन लढ्ढा :-** केव्हा तत्वत: मान्यता केव्हा दिली म्हाडाने ?

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** हि कोरोनाच्या पिरीएडच्या सुरू व्हायच्या आधी दिली म्हणजे कोरोना लागण्याच्या आधी त्यांनी

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे आता त्यालाही दहा / बारा महिने होवुन गेले ना , कोरोना समजा मार्च मध्ये सुरू झाला आणि त्याच्यापुर्वी म्हणताय तुम्ही म्हणजे जानेवारी पासुन

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** नाही भाऊ त्यांनी फक्त तोंडी सांगीतलेले होते. त्याच्यानंतर आपण एक बैठक घेवुन आपली जमीन ते पाहायला येणार होते पण कोरोना काळामुळे ते काही झाल नाही . शेवटी त्यांनी आपल्याला एक लेखी पत्र दिले आहे. आता मागच्या महिन्यात की तुम्ही जर आम्हाला महासभेची मंजुरी करून दिली आणि मंजुर नकाशांच्या कॉप्या उपलब्ध करून दिल्या तर आम्ही यासंदर्भात काम करण्यासाठी तयार आहोत. आपण टाऊन प्लॅनिंगची मंजुरी घेवुन नकाशे आपण ऑलरेडी मंजुर करून ठेवलेले आहेत. आता फक्त राहीले एक की महासभेच्या निर्देशाने एक ठराव पारीत करून पाहीजे आहे. तो येणाऱ्या महासभेमध्ये आपण ठेवुया.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ती चर्चा आज झाली नसती तर काय आहे. तो विषय पुढच्या महासभेपर्यंत काय पुढच्या वर्षाच्या सहामाही पर्यंत सुध्दा या विषयावर चर्चा झाली नसती .

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** नाही नाही भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** एक सांगु का तुम्हाला निधी आहे ना निधी ज्यावेळेला तुमच्याकडे असतो तेव्हा सगळी काम सोडुन पहिले निधीचं युटिलायझेशन कस होईल या संदर्भात म्हणजे खुप काळजी पुर्वक काम करणं गरजेच आहे. परंतू मला काही वाटत नाही की प्रशासनाला त्या निधीची काही चिंता आहे.एकतर एकीकडे निधी मिळत नाही आणि निधी शिल्लक असतांना कामं मार्गी लागत नाही. काल आमच्या बंटी जोशींना उपोषण करावं लागलं. एक दिवसाच आंदोलन कराव लागलं. का तर निधी असतांना कामाला जवळपास दिड वर्ष होवुन झाल्यानंतरही त्याकामाच्या विषयाला मार्गी लागत नाही.

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** नाही भाऊ मला. .

**श्री.नितीन लढ्ढा :-** कालांतराने अश्या पध्दतीने निधी लॅप्स होतात

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** नाही मी या सभागृहाला असे सांगु ईच्छितो की, त्यांचे लेखी पत्र आल्यानंतर मला त्याच्यावर रिर्पोर्टींग करून महासभेकडे प्रस्ताव पाठवायचा होता त्यामुळे त्याचा जो बंस होता ते रायटींग मध्ये पत्र मला आताच मिळालेल आहे आणि आता त्याच्यानंतर महासभा झालेली नाही. पण येणाऱ्या महासभेमध्ये नक्की येईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सोनगीरे साहेब आता .

**श्री.नितीन लढ्ढा :-** नक्कीच जिथे जिथे माझं प्रशासनाला हिच विनंती आहे आयुक्त महोदय की ज्या ज्या कामावर निधी शिल्लक असेल ते जास्तीत जास्त किती लवकर आपल्याला युटिलायझेशन करता येत असेल. काम कुठल्या स्वरूपाची घ्यायची कुठल्या पध्दतीची कामं त्याच्यामध्ये बसवायची परंतू निधी हा परत जाता कामा नये. आज २५ कोटी पैकी निधी शिल्लक पडलेला आहे. काय युटीलायझेशन करतोय त्याच किती निधी शिल्लक आहे २५ कोटी पैकी मा.आयुक्त महोदय

**श्री.कुलभुषण पाटील:-** मा.आयुक्त महोदय तुम्हाला सांगतो मी . .

**मा.आयुक्त :-** आता आपल्याला मुलभुत सोईसुविधा करीता जो निधी मिळालेला आहे. त्या निधी खर्च करण्यासाठी मुदत ३१ मार्च २०२१ दिलेली आहे.याच्या संदर्भामध्ये जिथे २५ कोटी असतील किंवा नागरी दलित वस्तीचे अनुदान असतील तिथे किंवा  इतर वस्ती अनुदान असेल किंवा इतरही म्हणजे अमृतच्या आपल्या दोनही योजना असतील , आमदार निधी असेल, खासदार निधी असेल म्हणजे थोडक्यात आपण शासकीय निधी मधुन आपण हाती घेणारी जी विकास काम आहेत.या सगळयांचीच मुदती आता ३१ मार्च २०२१ ला संपणार आहेत. प्रत्यक्ष या वर्षामध्ये मिळालेला आमदार निधी वगळता त्याला आपल्याला पुढच्या वर्षाच्या अखेरीची मुदत आहे.या निधी मधुन आपण जी काम हाती घेतलेली आहेत.

ती कोणत्याही परिस्थितीमध्ये अमृत सह मार्च २०२१ पर्यंत पुर्ण करण्याच्या दृष्टीने सतत त्याच नियोजन आणि पाठपुरावा करतोय. कुठल्याही परिस्थिती मध्ये मिळालेला निधी विकास काम न झाल्यामुळे किंवा मग मुदतीत न झाल्यामुळे परत जाणार नाही याच्या दृष्टीने आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत आहे. आपल्याला आपल्या स्वत:च्या उत्पन्न निधी पुरेसा उपलब्ध होत नाही. त्यामुळे शासकीय निधीचा पुर्ण उपयोग हा आपले विकास काम करण्यासाठी करण्यात येईल.कुठल्याही परिस्थिती मध्ये हि विकास काम पुर्ण होतील. काही काम जर समजा तांत्रिक कारणामुळे होणार नसतील. तरच तो निधी अखर्चीक राहण्याची शक्यता आहे. परंतू त्यासाठी सुध्दा नविन काम मंजुर करता येईल का की जे ३१ मार्च २०२१ पुर्वी पुर्ण होईल या दृष्टीने सुध्दा मागच्या आठवडयामध्ये घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये संबंधित खात्यांना सुचना दिलेल्या आहेत आणि आपल्या सुचनेप्रमाणे मनपाला प्राप्त झालेला निधी हा मनपा च्या विकास कामांमध्ये वापरला जाईल तो परत जाणार नाही अंमलबजावणी अभावी याची खबरदारी आपण घेवु.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय,

**श्री.नितीन लढ्ढा :-** आयुक्त साहेब मला फक्त हि माहिती द्या की, २५ कोटी मधील अखर्चीक निधी किती शिल्लक आहे आज , २५ कोटी मधील अखर्चीक निधी किती शिल्लक आहे.

**श्री. कपिल पवार, मुलेअ :-** २५ कोटी मधील निधी हा ११ कोटी शिल्लक आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही ११ कोटी पैकी काही काम जी आहेत ती प्रस्तावित आहेत तो वजा जाता किती निधी शिल्लक आहे.

**श्री. कपिल पवार, मुलेअ :-** ११ कोटी ची सर्वच काम प्रस्तावित आहेत सर म्हणजे विदआऊट कामांचा एकही निधी नाहीये आपल्याकडे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अस नाहीये माहिती घ्या.

**श्री.कुलभुषण पाटील:-** नाही नाही भाऊ मी सांगतो ११ कोटी पैकी त्यांच म्हणणं अस आहे की

**श्री.नितीन लढ्ढा :-** ११ कोटी पैकी , आयुक्त महोदय ११ कोटी पैकी जसे लिफ्ट चे कामं प्रस्तावित आहेत . कि ज्यांची देयक तयार झालेली आहेत म्हणुन तो आज अखर्चीक दिसतोय हि तांत्रिक बाब आहे. परंतू या व्यतिरीक्त की ज्याच्यावर कुठलही काम प्रस्तावित केले गेले नाही असा निधी सुध्दा शिल्लक आहे. त्याची किती रक्कम आहे ती माहिती मला पाहीजे.

**मा.आयुक्त :-** शासकीय निधींचा एक पुर्ण आढावा आम्ही मुख्यलेखाधिकारी यांच्या उपस्थिती मध्ये संबंधित जे आहेत आपले म्हणजे पाणी पुरवठा , विद्युत आणि आपले बांधकाम याच्यामध्ये घेण्यात आलेला होता . मला मिळालेल्या माहितीप्रमाणे याच्यामध्ये असा कोणताही निधी नाही की ज्याच्या कामाच नियोजन झालेल नाही. तरी आपली जी सुचना आहे त्याच्याप्रमाणे खातरजमा करू. असा कोणता निधी आहे की ज्याच अजुन नियोजन केलेल नाहीये आणि केवळ काम आपण प्रस्तावित न केल्यामुळे तो निधी अखर्चीक राहण्याची शक्यता आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आयुक्त महोदय,

**मा.आयुक्त :-** असा कोणताही निधी नाहीये परंतू त्याचा आढावा पुन्हा एकदा निश्चित घेवु

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय

**श्री.नितीन लढ्ढा :-** आयुक्त महोदय, २५ कोटी पैकी १ कोटी रूपये आपण ट्रॅफीक गार्डन साठी निधी नियोजित केलेला होता . त्याच्या निविदा प्रक्रीया झालेल्या होत्या. त्या निविदा प्रक्रीया रद्द झाल्या . ती जागा सुध्दा कोर्टाच्या विस्तारासाठी ती जागा देण्यात आलेली आहे. १ कोटी रूपये निधी तो शिल्लक आहे. ८० लाख रूपयांची तरतूद आपण जळगांव शहरामध्ये स्मशानभुमि मध्ये विद्युत दाहिनी बसविण्याच्या संदर्भातील भुमिका आपण प्रस्तावित केलेली होती. कालांतराने स्मशानभुमिमध्ये विद्युत दाहिनी हि खाजगी संस्थेच्या माध्यमातुन बसविली जातेय. असा १ कोटी ८० लाख रूपय खर्चाचा निधी हा मला वाटतो की अजुन त्याच्यावर कुठलेही काम प्रस्तावित झालेले नाहीत. अशी माझी माहीती आहे.

**मा.आयुक्त :-** आपल्या माहितीची पुन्हा एकदा खातरजमा करू . नितीनभाऊ म्हणताहेत त्याप्रमाणे १ कोटी आणि हया विद्युत दाहिनीचे ८० लाख तर १ कोटी ८० लाख यांची जर नविन काम प्रस्तावित केली नसतील जुनी काम आपण काही कारणामुळे करू शकत नसतील . तर आपल्याला आता हा निधी खर्च करण्यासाठी ३१ मार्चची मुदत आहे.त्यादृष्टीने जर आपल्याला नियोजन करण आवश्यक आहे ते आपण तातडीने करू. जेणेकरून हा १ कोटी ८० लाख निधी सुध्दा शहरामध्ये कोणत्या ना कोणत्या विकास कामासाठी आपल्याला खर्ची पाडता येईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय,

**श्री.नितीन लढ्ढा :-** आयुक्त महोदय, हा संपुर्ण निधी मिळायला आता तिन वर्ष कालावधी झाला आणि तिन वर्षाच्या कालावधी मध्ये जो काही निधी जे काही काम प्रस्तावित झालेले असतील त्याचे पुर्ननियोजन करणे याला सुध्दा खुप मोठा विलंब झालेला आहे आणि हा निधी परत जायची वेळ यायची ठेपलेली आहे. एकीकडे विकास कामांसाठी निधी अपुर्ण पडतोय आणि एकीकडे निधी पडलेला आहे परंतु तो खर्चही केला जात नाहीये खुप गंभीर बाब आहे हि

**मा.आयुक्त :-** या दोन्ही कामांचा आढावा घेवु आणि जर १ कोटी ८० लाख आपल्याला त्याच्यामध्ये खर्च करणे तांत्रिक दृष्ट्या शक्य नसेल तर शासनाशी बोलुन आपल्याला नविन काम प्रस्तावित करता येतील का जर येत असतील तर आपण ती महासभेच्या मान्यतेने करू.

**श्री.नितीन लढ्ढा :-** निश्चितपणे सर आपण याची माहिती घ्यावी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय, टाऊन प्लॅनिंगचे जे , टाऊन प्लॅनिंग , हॅलो टाऊन प्लॅनिंगच्या संदर्भात जे प्लॅन आपण मंजुरीला टाकतो हया पंतप्रधान आवास योजनेचे तिथे अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे तिथे वेळकाळ लागतो . तर तिथे जे इंजिनिअर असतील जे खालचे इंजिनिअर असतील त्यांना त्या परवानग्या देण्याचा अधिकार देण्यात यावा हि माझी विनंती आहे.

**श्री.नितीन बरडे :-** हॅलो

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हॅलो

**श्री.नितीन बरडे :-** हॅलो

**मा.सभापती :-** हा नितीनभाऊ , नवनाथभाऊ

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** या ७ नंबरच्या विषयावर बोलतोय मी ७ नंबर विषयावर काही अधिकारी लोकांना असा प्राब्लेम येतो पंतप्रधान आवास योजनेच्या मध्ये आपण जे बांधकाम परवानगीचा नकाश मंजुर करतो तर बांधकाम करण्यासाठी त्याठिकाणी त्यांचे जे अधिकारी राहतात नगररचनाकार ते टाईमावर वेळेवर मिळत नाही. त्याकरीता खालच्या अधिकाऱ्यांला त्या त्या विभागाच्या अधिकाऱ्यांला प्लॅन मंजुरीसाठी अधिकार द्यावे. असे मी सुचित करतो.

**श्री.नितीन बरडे :-** हॅलो राजु भाऊ

**मा.सभापती :-** हा नितीनभाऊ नवनाथ भाऊंचा विषय पुर्ण होवु द्या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हॅलो

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** मध्यंतरीच्या काळामध्ये नगररचना विभागामध्ये अधिकारी नसल्याने कायमस्वरूपी अधिकारी नसल्याने आपले नकाशे मंजुरी होण्यासाठी खुप विलंब होत होता.परंतू त्याठिकाणी आता निकम साहेब हजर झालेले आहेत. ते आठवडयातुन दोनच दिवस येतात म्हणुन आपण एक प्रस्ताव ठेवलेला होता की, त्यांना पंतप्रधान आवास योजनेच्या संदर्भामध्ये आपण ऑफलाईन प्रस्ताव जमा करतो. आता संपुर्ण शहरामध्ये ऑनलाईन प्रस्ताव चालु झालेले आहेत. फक्त पंतप्रधान आवास योजनेला गर्व्हमेंटने सवलत दिली आहे की तुम्ही ऑफलाईन प्रस्ताव सादर करू शकतात. आता त्या संदर्भामध्ये एक प्रस्ताव असा ठेवण्यात आला होता की, जसे निकम साहेब आठ दिवसातुन एकदा येतात तर ते लवकरात लवकर मंजुर होण्यासाठी मा.भोसले साहेब शहर अभियंता यांनी यापुर्वी टाऊन प्लॅनिंगला काम केलेले आहे . त्यांना तिथल्या कामाचा चांगला अनुभव आहे म्हणुन त्यांना परमिशन चे अधिकार जर देता येत असतील . तर त्या संदर्भात आपण एक प्रस्ताव ठेवलेला आहे.मा.आयुक्त साहेबांनी निकम साहेब ज्या दिवशी येतील त्या दिवशी एक बैठक बोलावली आहे. शहर अभियंता मा.निकम साहेब आणि आयुक्त साहेबांची बैठक होवुन त्यावर चर्चा झाल्यावर त्यावर निर्णय होईल आणि त्या अनुषंगाने आपण नकाशे लवकरात लवकर मंजुर करू शकतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** लवकरात लवकर मार्गी लावा साहेब तुम्ही सांगीतलेला विषय

**श्री.सोनगीरे , बांधकाम विभाग :-** ठिक आहे.

**श्री.नितीन बरडे :-** हॅलो राजु भाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन बरडे :-** हॅलो राजु भाऊ

**मा.सभापती :-** हा नितीनभाऊ बोला आवाज येतोय तुमचा

**श्री.नितीन बरडे :-** हॅलो राजु भाऊ

**मा.सभापती :-** हा नितीनभाऊ बोला आवाज येतोय तुमचा

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब आता आपण सांगीतल्या प्रमाणे हॅलो आयुक्त साहेब

**मा.सभापती :-** हा नितीनभाऊ बोला आवाज येतोय तुमचा

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेबांशी बोलायचे आहे. आता आपण सांगीतल्याप्रमाणे प्रस्तावित केलेले आहेत. पण प्रस्तावित कामांमधुन आता जर मक्तेदारांनी जर काम पुर्ण केले नाही. तर मक्तेदारांवर आणि अधिकाऱ्यांवर आपण काय कार्यवाही करणार ?

**मा.आयुक्त :-** हो मुद्दा आपला लक्षात आला . आपल्याला हि काम कुठल्याही परिस्थितीमध्ये ३१ मार्च पर्यंत पुर्ण करणे गरजेच आहे. कारण ३१ मार्च नंतर या निधीला मुदतवाढ मिळण्याची शक्यता फार कमी आहे. त्या दृष्टीने आपले जे

तिनही विभाग आहे. पाणी पुरवठा असेल , विद्युत आणि बांधकाम या तिन्ही विभागांचे सर्व इंजिनिअर ची बैठक दिवाळीच्या अगोदर घेतलेली आहे आणि हे संपुर्ण काम त्या त्या मक्तेदाराची आता असलेली गती विचारात घेवुन त्याला गती वाढवायला लावण आपण ३१ मार्च पर्यंत हे काम पुर्ण करून हा निधी खर्च होईल या दृष्टीने नियोजन करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. जर समजा या मधल्या पिरीएड मध्ये जर एखादी एजन्सी काम करण्यामध्ये काही टाळाटाळ होत असेल किंवा त्याची कॅपॅसिटी नसेल तर आपल्याला तातडीने त्याच काम रद्द करून पर्यायी व्यवस्था सुध्दा करावी लागेल. एजन्सी वर विसंबुन राहुन आपल्याला ३१ मार्चची डेडलाईन टाळता येणार नाही. इंजिनिअर लोकांच्या बाबतीमध्ये त्यांना सक्त सुचना दिलेल्या आहेत. जर एजन्सीच्या बाबती मध्ये अडचण असेल तर तातडीने काम रद्द करून फेर निविदा काढाव्या लागतील आपल्याला परंतू सद्यातरी तशी परिस्थिती माझ्या ऐकण्यामध्ये आलेली नाहीये. एखाद्या एजन्सीच्या अकार्यक्षमतेमुळे ३१ मार्च पर्यंत हा निधी खर्च होण्याची शक्यता नाही.परंतू तशी जर कधी तशी परिस्थिती उदभवली तर आपल्याला मुदतवाढ न देता तातडीने हे काम रद्द करून हे काम ३१ मार्च पर्यंत पुर्ण करून घ्याव लागणार आहे.

**श्री.नितीन बरडे :-** एक परिस्थिती आली ना साहेब काल आमचे गटनेते बंटीभाऊ जोशी यांनी धरणे आंदोलन केले होते. सागर पार्क , सागरपार्कवर लाईटाचे काम बाकी आहे आणि ट्रॅकचही काम बाकी आहे का होत नाहीये पुर्ण हॅलो याला जबाबदार कोण आहे साहेब का कोणाच्या सांगण्यावरून हे काम थांबविण्यात आलेल आहे.

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** जॉगींग ट्रॅकच काम पदमालय कन्ट्रक्शनला दिलेल होत. त्याची मुदत फेब्रुवारी २०२० ला संपली. त्या मुदतीत मक्तेदाराने काम सुरू केलेल नाही. तर आता

**श्री.नितीन बरडे :-** मग पहिले त्याच्याकडून का करून घेण्यात आल नाही. पहिले करून घेण्याची जबाबदारी कोणाची होती ?

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** ती जबाबदारी संबंधित कनिष्ठ अभियंता यांची होती

**श्री.नितीन बरडे :-** मग त्यांना कोणी थांबवल का काम करण्यास कोणी नकार दिला का मग त्यांच्यावर काय कार्यवाही करणार मग मुदतीत काम करून घेतले नाही त्यांनी म्हणुन त्यांच्यावर काय कार्यवाही करणार

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** त्यांना कारणे दाखवा नोटीस देवुन त्यांच लेखी मागवतो वाटल्यास

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब आपण काय कार्यवाही करणार यांच्यावर आपण यांनी काम मुदतीत पुर्ण करून घेतल नाही. आपण यांच्यावर काय कार्यवाही करणार ?

**मा.आयुक्त :-** नाही आता आपले सन्मा. गटनेते जोशी साहेब काल धरणे आंदोलनाला बसले होते की सागर पार्कच जे काही काम आपण हाती घेतलेल आहे. काही काम झाल आणि काही काम अर्धवट राहीलेल आहे. आता जसे जॉगींग ट्रॅक आणि त्याठिकाणी विद्युत व्यवस्था आता हे काम भोसलेंनी सांगीतल्याप्रमाणे फेब्रुवारी २०२० पर्यंत पुर्ण होण अपेक्षित होत म्हणजे साधारण आठ नऊ महिन्यापुर्वी पुर्ण व्हायला पाहीजे होत. आता हि वर्कऑर्डर दिलेली आहे. निधी उपलब्ध आहे. अश्या वेळेला ते काम का झालेले नाही. आपण म्हणतात त्याप्रमाणे कदाचित काही काम न करण्याबद्दलच्या काही सुचना प्रशासनामार्फत दिल्या गेल्या होत्या का? आता त्यावेळेचे सिटी इंजिनिअरही नाहीयेत. मग आत्ता ऑन द स्पॉट त्याचा आपल्याला त्याचा खुलासा नाही होणार. परंतू आम्ही याची माहिती घेवु कि नेमक काम का पुर्ण झाल नाही . मक्तेदाराची काही अडचण होती की प्रशासनाकडुन तश्या प्रकारच्या काय सुचना गेल्या होत्या किंवा काही आजुबाजुच्या भागाच्या काही नागरीकांच्या काही तश्या मागण्या प्राप्त झाल्या होत्या याचीही माहिती घेवु. तर आपल्याला त्याप्रमाणे हे काम ३१ मार्च पर्यंत पुर्ण करून घेता येईल. परंतू हे काम का अर्धवट अवस्थेमध्ये ठेवलेल आहे याची आपण माहिती घेवु जर तशी काही योग्य अडचण वाटली तर आपण सभागृहाला विश्वासात घेवु जर काही अडचण नसेल तांत्रिक अडचण नसली तर ते काम पुर्ण करणे गरजेच असेल तर ते काम ३१ मार्च पर्यंत पुर्ण करणे गरजेच आहे.

**श्री.नितीन बरडे :-** काम गरजेच आहे ना साहेब ते रात्री फीरायला तिथे लोक येतात तर विद्युत व्यवस्था पाहीजे ना. विद्युत व्यवस्था घेतलेली आहे ना आपण.

**मा.आयुक्त :-** नाही , म्हणुनच मी म्हटंल की जॉगींग ट्रॅक आणि विद्युत व्यवस्था काम घेतलेल होत वर्कऑर्डर दिलेली आहे. निधी आहे. अश्यावेळेला का झाल नाही हे थोडीशी माहिती घ्यावी लागेल. तिथले त्यावेळेचे सिटी इंजिनिअर असतील किंवा आपले शाखा अभियंता असतील त्यांच्याकडुन माहिती घेवु काही कुठलीही अडचण नसेल तर काम आपल्याला आत्ताही घेता येईल. काही अडचण असेलतर त्याच्यावर आपण विचार करू

**श्री.नितीन बरडे :-** याला जो जबाबदार असेल साहेब त्याच्यावर कार्यवाही व्हायला पाहीजे.

**मा.आयुक्त :-** जर इंजिनिअरच्या दोषामुळे जर समजा काही काम प्रलंबित असेल तर त्याच्यावर जबाबदारी आपण निश्चित करू शकतो पण तत्पुर्वी एकदा काम का झाल नाही याची आपल्याला माहिती घ्यावी लागेल.

**श्री.नितीन बरडे :-** मक्तेदार काम करत नसला तर

**मा.आयुक्त :-** मी म्हटंल ना जर मक्तेदार काम करत नसेल आणि आपल्याला काम करून घेण गरजेच असेल मक्तेदारावर आपल्याला कार्यवाही करता येईल. फेरटेंडर काढुन आपल्याला उरलेल काम आपल्याला नविन एजन्सी नेमुणही करून घेता येईल

**श्री.नितीन बरडे :-** ठिक आहे.

**मा.सभापती :-** ललीतभाऊ , अजेंडयावरील पहिला विषय मंजुर करून घेत असतांना आपले मुख्यलेखाधिकारी उपस्थित नसल्यामुळे त्याच्या पान क्रं. आठ मध्ये एक वाक्याची दुरूस्ती आहे कार्यवृत्तामध्ये तर मुख्यलेखाधिकारी दुरूस्तीचे सांगतील.

**श्री. कपिल पवार, मुलेअ :-** सन्मा.सभागृह १ नंबरचा विषय असतांना मी कलेक्टर ऑफीसला मिटींगला होतो तरी तेव्हाच हा विषय सांगीतला असता. विषय असा होता की मागच्या वेळेस चिकुनगुणिया , डेंग्यु , मलेरिया यांच्या जी फवारणीचा खर्च आहे. तो आपण संसर्गजन्य आजारातुन जे मनपा निधीतील हेड आहे त्याच्यामधुन करावा असा आपला प्रस्ताव होता आणि त्यात चर्चा अशी झाली होती की १४ व्या वित्त आयोगाच्या व्याजातुन हा खर्च करता येईल का ? त्याच्यावर मी उत्तर असे दिले होते की १४ व्या वित्त आयोगाच्या व्याजातुन हा खर्च करता येणार नाही. फक्त कोविड साठीच हा खर्च करता येईल.पण आपल्या इतिवृत्तात अस आलेल आहे की १४ व्या वित्त आयोगातुन हा खर्च करावा लागेल तर ती बाब जस मी म्हंटल होत त्या हिशोबानेच आली पाहीजे त्यासाठी हा बदल करावा हि विनंती.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय , विषय संपले असतील तर मला एक शब्द उपलब्ध करून घ्यायचा आहे तुमच्या कडुन हॅलो , हॅलो, हॅलो अध्यक्ष महोदय

**मा.सभापती :-** हो बोला

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** विषय असा आहे कोरोना संदर्भात महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना ५० लाखांचा इंन्शुरन्स म्हणजे विमा तर त्याच्या बाबत पाठपुरावा , पुर्तता झाली का? आम्ही मागणी केली होती. त्याचा जि. आर सुध्दा आलेला आहे केंद्र, महाराष्ट्र सरकारचा तर त्याचा पाठपुरावा झाला का ५० लाखाच्या इंन्शुरन्सचा कोरोना संदर्भात कर्मचारींचा विमा ५० लाखांचा त्या संदर्भात याची प्रशासनाने माहिती द्यावी.

**मा.आयुक्त :-** शासनाच जे धोरण आहे. कोरोनाची ज्यांना कर्तव्य बजावत असतांना कोरोनाची जर लागण झाल्यामुळे जर एखाद्याचा जर मृत्यु झाला तर त्याला ५० लाखाची विमा कवच देण्याची शासनाची योजना आहे.त्याप्रमाणे आपल्याकडील माझ्या माहिती प्रमाणे एक बांधकाम विभागाकडील एक मुकादम यांचा कंन्टेंमेंट झोनची बॅरीकेटींग करण्याची ड्युटी त्यांना देण्यात आली होती आणि त्यामध्ये त्यांना कोरोनाची लागण झाली आणि त्यांचा दुर्देवी मृत्यु झाला आणि हा प्रस्ताव आपण राज्य शासनाला पाठविलेला आहे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** आणि आता सफाई कामगार आहेत. काही सफाई कर्मचारी CC वन ला काम करताय आपले सफाई कामगार त्यांना पण तो इंन्शुरन्स लागु होईल ना सर

**मा.आयुक्त :-** कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजनेमध्ये काम करणारे सर्व कर्मचारी म्हणजे त्याच्यामध्ये कोविड केअर सेंटर मध्ये काम करणारे आरोग्य कर्मचारी असतील, डॉक्टर असतील , परिचारीका असतील कुणीही ईव्हन आपले सर्वे करणारे शिक्षक , आशा सेविका, तात्पुरत्या स्वरूपाचे कंत्राटी कर्मचारी सर्व कर्मचारी मग ते कायम असतील किंवा आपण ते कंत्राटी पध्दतीने घेतले असतील . ज्यांना कोविड ड्युटी असतांना मृत्युच्या अगोदर जर १४ दिवसांपर्यंत जर ते कोविड ड्युटीवर असतील आणि कोविड लागण झाल्यामुळे जर त्यांचा मृत्यु झाला अस जर त्यांच्या मृत्युच कारण वैद्यकीय दाखल्यामध्ये जर नमुद असेल तर ते पात्र ठरतील अस शासनाचं धोरण आहे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** साहेब आपले जे अधिकारी आहेत रावलानी साहेब , तर रावलानी साहेबांच अस म्हणण पडत की इंन्शुरन्स कोणालाच लागु झाला नाहीये माझ्या माहितीनुसार , हॅलो

**मा.आयुक्त :-** राज्य शासनाची जी योजना आहे आपण आपल्या कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव पाठविलेला आहे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** रावलानी साहेब सांगतात की बुवा आम्ही प्रस्ताव पाठविला , आमच्याकडुन काही प्रस्ताव पाठविला नाही अस रावलानींच म्हणण आहे. पत्रकारांना सुध्दा त्यांनी सांगीतलेले आहे.

**मा.आयुक्त :-** आस्थापना विभागाकडुन गेलेला आहे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** ठिक आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २९१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शक सुचने नुसार अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता मनपा मार्फत चार पदांकरीता उमेदवारांची नियुक्ती बाबत नियमानुसार प्रक्रीया राबवुन तात्पुरत्या कालावधीकरीता मानधनावर पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली होती. त्याचा तपशील खालील प्रमाणे

| अ. नं. | पद | नियुक्त उमेदवाराचे नांव | आदेश क्र. व दिनांक | प्रती महा मानधन | नियुक्तीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | अर्बन प्लॅनर | ओंकार शशिकांत कुलकर्णी | २०८,दि.१८/०६/२०१९ | रु.३५,०००/- | दि.२०/०६/२०१९ ते |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | दि.१९/०५/२०२० |
| २ | सिव्हील इंजि. | निलेश राजेंद्र अत्तरदे | २१०,दि.१८/०६/२०१९ | रु.३५,०००/- | ---,,--- |
| ३ | MIS | अश्विनी भाऊसाहेब सैंदाणे | २०९,दि.१८/०६/२०१९ | रु.३५,०००/- | ---,,--- |
| ४ | सोशल डेव्ह. स्पेशॉलिस्ट | सतिष रुपचंद्र गद्रे | २११,दि.१८/०६/२०१९ | रु.३५,०००/- | ---,,--- |

उपरोक्त उमेदवारांच्या नियुक्तीची मुदत १९/०५/२०२० रोजी संपत असल्याने त्यांच्या विनंती अर्जावरुन व आयुक्त यांच्या दिनांक ०५/०६/२०२० च्या मान्यतेने २ दिवसांच्या तांत्रिक खंड देवुन पुढील तीन महिन्याकरीता मुदतवाढ देण्यात आली होती. व पुढील वर्षाकरीता मानधन अदा करणेकामी आवश्यक निधीची शासनाकडे मागणी करणे कामी (सा.बा./१७९ दि.१५/०६/२०२० अन्वये १५,४०,०००/- रुपये मात्र) पत्र देण्यात आलेले आहे. व या कर्मचाऱ्यांना दि.२२/०५/२०२० ते २१/०८/२०२० या कालावधीकरीता पुनर्नियुक्ती आदेश दि.११/०६/२०२० रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत. या कर्मचारींना दिलेल्या पुनर्नियुक्ती आदेशाची मुदत ही दि.२१/०८/२०२० रोजी संपत असल्याने पुढील एक वर्षाच्या कालावधी करीता नियुक्ती करुन त्या बाबतचे आदेश मिळणे करीता खालील चार कर्मचाऱ्यांपैकी दोन कर्मचाऱ्यांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत.

१) श्री.ओंकार शशिकांत कुलकर्णी :- अर्बन प्लॅनर यांनी दिनांक ०१/०७/२०२० रोजी वैयक्तीक कारणास्तव लेखी राजिनामा सादर केलेला आहे.
२) श्री.सतिश रुपचंद्र गद्रे :- सोशल डेव्हलपमेंट स्पेशालीस्ट हे १ जुलै २०२० पासुन कोणतीही पूर्वपरवानगी न देता परस्पर आपल्या गावी निघुन गेलेले असल्याने त्यांना १ जुलै २०२० पासुन कोणतेही मानधन अदा केलेले नाही.
३) श्री.निलेश राजेंद्र अत्तरदे :- सिव्हील इंजिनिअर हे पूनर्नियुक्तीच्या आदेशानुसार पूर्ववत व पूर्णवेळ कामावर असुन PMAY योजनेच्या कामासोबतच Covid - १९ चे त्यांच्यावर सोपवलेले काम देखील करीत असुन त्यांनी पुढील वर्षाकरीता पुनर्नियुक्ती मिळणे कामी सा.बा.आवक क्र.९८६ दि.२०/०८/२०२० अन्वये अर्ज सादर केलेला आहे.
४) श्रीमती अश्विनी भाऊसाहेब सैंदाणे :- एम.आय.एस. स्पेशालीस्ट या देखील पूर्ववत व पूर्णवेळ कामावर हजर असून PMAY योजनेच्या कामासोबतच Covid - १९ चे त्यांच्यावर सोपवलेले काम करीत आहेत.

या नुसार एकुण ०४ पैकी फक्त ०२ कर्मचारीचे पुढील वर्षभराच्या कालावधीसाठी पूनर्नियुक्ती मिळणे बाबतचे विनंती अर्ज मुदतीत प्राप्त झालेले आहेत. मात्र या कर्मचाऱ्यांचे मानधन अदाकरणे कामी शासनास लेखी पत्रान्वये कळविण्यात आलेले असले तरी शासनामार्फत मानधन अदा करण्यासाठी अदयापपावेतो निधी प्राप्त झालेला नाही. यापूर्वी या कर्मचाऱ्यांना तीन महिन्याकरीता मुदतवाढ देतांना शासनाकडुन मानधनापोटी प्राप्त निधी पैकी रक्कम रु.४,६८,६६८/- रुपये मात्र निधी शिल्लक असले बाबत अर्थ विभागाचा अहवाल प्राप्त होता. त्यातून या कर्मचाऱ्यांना त्यांच्या पुनर्नियुक्तीच्या तारखेपर्यंतचे म्हणजेच सन दि.२१/०८/२०२० पर्यंतचे मानधन अदा करण्यात आलेले आहे.

कोव्हीड - १९ च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्रगतीचा वेग देखिल मंदावला आहे, लॉकडाऊनच्या काळात लाभार्थींचे सुरु असलेले घरकुलांचे बांधकामास ब्रेक लागल्याने घरकुलांच्या बांधकाम पूर्णत्वाचा कार्यवाहीस विलंब होत आहे. नविन प्रस्ताव तयार करुन शासनामार्फत मान्यता प्राप्त करणेची कार्यवाही थांबलेली आहे व हि परिस्थीती बदलवण्यासाठी कीती कालवधी लागेल हे निश्चित नाही.

शहर अभियंता यांच्या अहवालानूसार १)श्री.ओंकार शशिकांत कुलकर्णी,अर्बन प्लॅनर यांनी राजीनामा दिलेला आहे, २)श्री.सतिश रुपचंद्र गद्रे, सोशल डेव्हलपमेंट स्पेशालिस्ट हे कोणतीही पुर्व परवानगी न घेता परस्पर आपल्या गावी निघून गेलेले असल्याने सदर दोन्ही कर्मचारी वगळता १)श्री.निलेश राजेंद्र अत्तरदे, सिव्हील इंजिनिअर, २)श्रीमती अश्विनी भाऊसाहेब सैंदाणे, एम.आय.एस.स्पेशालिस्ट यांची दि.२१/०८/२०२० रोजी मुदत संपत असल्याने उपरोक्त दोन मानधनावरिल कर्मचाऱ्यांनी मुदतवाढ / पुनर्नियुक्ती साठी अर्ज दाखल केलेले असल्याने त्यांना नियमाप्रमाणे खंड देवून दिनांक ३१ मार्च २०२१ पावेतो दरमहा रक्कम रु.३५,०००/- याप्रमाणे

मानधनावर नियुक्ती देणेस तसेच शासनाकडून अनुदान प्राप्त झालेले नसल्यास शासनाकडुन जोपर्यंत मानधन अदा करणेसाठी आवश्यक अनुदान प्राप्त होत नाही तो पर्यंत त्यांचे दरमहाचे मानधन हे महानगरपालिकेच्या निधीतुन करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मनपा फंडातून उपरोक्त मानधनाची रक्कम अदायगी केल्यानंतर शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यास देलेली मानधनाची रक्कम तात्काळ मनपा फंडात वर्ग करण्याची कार्यवाही संबंधित विभागांनी करावी.

तसेच अर्बन प्लॅनर व सोशल डेव्हलपमेंट स्पेशालिस्ट या पदांची आवश्यकता भासत असल्यास सदरची दोन पद भरण्याची प्रशासनाने कार्यवाही करावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते:-००**

**सुचक:- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. ८ :-** मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्रं.०१ ते ०८ व १० ते १९ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे कामी मक्तेदार यांचे वाटाघाटी अंती आलेल्या दरास व त्यानुसार येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.सभापती :-** ललीतभाऊ , ललीतभाऊ कोल्हे माईक चालु करा , ललीतभाऊ माईक चालु करा.

**श्री.ललीत कोल्हे :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

**मा.सभापती :-** सरीताताई , सरीताताई नेरकर , ललीतभाऊ

**श्री.ललीत कोल्हे :-** सुचक आहे.

**मा.सभापती :-** नवनाथभाऊ अनुमोदन द्या.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** अनुमादेन आहे , अनुमोदन आहे ८ व्या विषयाला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय, सभापती महोदय हॅलो, हॅलो नेट चालत नाहीये

**मा.सभापती :-** हो भाऊ , नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** हॅलो सभापती महोदय,

**मा.सभापती :-** हो भाऊ बोला

**श्री.नितीन लढ्ढा :-** आमचा फक्त एवढाच विषय आहे की आपल्या पाणी पुरवठयाच्या संदर्भातील चर्चा ज्या वृत्तपत्रांच्या माध्यमातुन येत आहेत.

**मा.सभापती :-** हो भाऊ बोला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हॅलो

**मा.सभापती :-** हो भाऊ बोला येतोय आवाज

**श्री.नितीन लढ्ढा :-** हॅलो आपण २४/७ म्हणजे २४ तास ७ हि दिवस अमृत योजनेच्या संदर्भात आज साधारणत:

**मा.सभापती :-** हो भाऊ तुमचा आवाज कट होतोय , नितीनभाऊ तुमचा आवाज कट होतोय , नितीनभाऊ तुमचा आवाज कट होतोय माईक ऑन करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हॅलो राजु भाऊ आता येतोय

**मा.सभापती :-** हो येतोय

**श्री.नितीन लढ्ढा :-** हॅलो राजु भाऊ आता येतोय

**मा.सभापती :-** हो येतोय तुमचा बोला

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी म्हंटल की २४/७ च्या दृष्टीकोनातुन अमृतच्या पाणी पुरवठ्याच्या दृष्टीकोनातुन आपण नियोजन केलेल आहे. परंतू दोन दिवसांपासुन वृत्तपत्रामध्ये ज्या बातम्या येताहेत. त्याच्या अनुषंगाने अस दिसतय की, पाणी पुरवठा योजनेमध्ये मिटरच नियोजनच केल्याच दिसुन येत नाहीये , तर नेमकी परिस्थिती काय आहे.

**मा.सभापती :-** देतो माहिती देतो . सर्वांनी बसुन घ्यायच आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** मिटरला डिपीआर मध्ये समावेश नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मिटरला डिपीआर मध्ये समावेशच नाहीये.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** नाही कारण की कुणालाच मान्यता दिलेली नाहीये आणि त्याचप्रमाणे आपल्यालाही जळगांव शहराला मान्यता दिलेली नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कुणी राज्य शासनाने मान्यता दिलेली नाहीये का?

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** राज्य शासनाने डिपीआरला मान्यता देतांना मिटरचा समावेश दिलेला नाहीये.

**मा.सभापती :-** नितीनभाऊ तुमचा आवाज येत नाहीये, नितीनभाऊ , नितीनभाऊ तुमचा आवाज येत नाहीये , तुमच्या नेटला प्राब्लेम आहे वाटत , नितीनभाऊ तुमच्या नेटवर्कला प्राब्लेम आहे . हा विषय पुढच्या मिटींगला घेवु. तुमचा माईक ऑन करा आता . नितीनभाऊ माईक ऑन करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा मी म्हंटल अत्यंत महत्वकांक्षी योजना आहे हि जळगांव शहराची आणि या महत्वकांक्षी योजनेच्या अनुषंगाने २४ बाय ७ म्हणजे २४/७ आपण पाण्याचे नियोजन केलेले आहे आणि आज आपल्याला जी माहिती उपलब्ध होतेय की आज याच्यामध्ये मिटरचा समावेशच केला गेलेला नाहीये . मग याच्या संदर्भात नेमकी भुमिका काय आहे प्रशासनाची कि गेले दोन वर्षापासुन हि स्कीम कार्यान्वीत होतेय. आता शेवटच्या अंतिम टप्प्यात हि स्किम येवुन पोहोचलेली आहे आणि २४ तास नागरीकांना पाणी देण्याच्या संदर्भात जर भमिका असेल तर ती कश्या पध्दतीने शक्य होईल.

**मा.सभापती :-** बोरोले साहेब

**मा.आयुक्त :-** नितीनभाऊ याच्यावर मला अस वाटत की याच्यावर ऑन द स्पॉट अशी चर्चा करून अपुऱ्या माहितीवर चर्चा करण्यापेक्षा याच्यासाठी स्वतंत्र चर्चा मला अस वाटत की सन्मा.सभापती साहेबांनी चर्चा आयोजित करावी. त्याच्यामध्ये स्थायी समिती सदस्य किंवा एक अधिकृत बैठक घ्यायला हरकत नाही. तत्पुर्वी आपण ही जी योजना केली आहे. त्याचा डिपीआर महानगरपालिकेमार्फत शासनाकडे पाठविला . त्याच्यामध्ये व्यक्तीगत पातळीवर अस मी त्याच्यामध्ये सांगतो की शहरामध्ये सर्व नळ कनेक्शन धारकांना २४ तास ७ ही दिवस पाणी पुरवठा करण्याच्या तत्वावर हि योजना आपण डिजाईन केली आहे का जर केलेली असेल तर मग मिटर विरहीत व २४/७ आणि अश्या प्रकारची पाणी पुरवठा योजना होवु शकेल का ? दुसरी गोष्ट समजा आपल्याला २४/७ पाणी पुरवठ्यासाठी मिटर आवश्यक आहे अस जर असेल तर मग त्याबाबतीमध्ये त्यावेळेला स्कीम मंजुर करत असतांना शासनाच धोरण काय होत की मिटर तर आवश्यक आहे परंतू डिपीआर मध्ये समावेश करायचा नाही म्हणजे राज्य शासनाच्या धोरणाप्रमाणे हा खर्च महानगरपालिकेने करावा अस काही धोरण होत का या सगळयांची माहिती घ्यावी आणि मग आपल्याला त्याच्यावर काहीतरी चर्चा करता येईल आणि मग चर्चेच्या अनुषंगाने जे आपले एम आहेत की शहरातील सगळया नागरीकांना २४/७ पाणी पुरवठा व्हावा यासाठी जर मिटर ईनेटेबल असतील तर ते अत्यावश्यक आहे कारण मिटरला काही पर्याय असु शकत नाही. तर मग आपल्याला आपण म्हणताय त्याप्रमाणे महापालिका म्हणुन नियोजनही कराव लागेल की मग विदआऊट मिटर २४/७ आपण कसा देणार आणि जर मिटर आवश्यक असतील. तर मिटर साठीची येणाऱ्या खर्चाची तरतूद आपण कशी करणार ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.आयुक्त महोदय, आज मला वाटत की आपल्याला येवुन जवळपास सहा महिन्यांचा कालावधी झालाय आणि सत्ताधारी जे बसलेले आहेत.त्यांनाही जवळपास दोन वर्षाच्या वरचा कालावधी झालेला आहे. २४/७ च्या अनुषंगाने झालेली हि योजना आहे आणि तिच नियोजनच म्हणजे सुरूवाती पासुनच आपली भुमिका हि होती कि २४/७ पाणी दिल्यानंतरच या पध्दतीने आपल्याला या संदर्भातील पाण्याची बचत होण अपेक्षित होत. त्याच्या मागचा मळ हेतूच हा होता .परंतू मला अस वाटत की प्रशासनाने सुध्दा या बीबीकडे गांर्भीने लक्ष दिलेल दिसत नाहीये आणि पदाधिकाऱ्याकडुनही या गोष्टीकडे कुठेतरी दुर्लक्ष झालेल दिसुन येतय. म्हणजे आज सभागृहात दोनशे कोटी रूपयांची योजना हि या शहरासाठी एक महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणुन आज आपण त्याचा जोराने ढंढोरा पिटतो. परंतू ती योजना काय आहे. याच ज्ञान प्रशासनाला नाहीये आणि पादाधिकऱ्यांनाही नाहीये हि मला वाटत शोकांतिका ठराविशी वाटते. कारण एखादी योजना

**मा.सभापती :-** नितीनभाऊ तुमचा आवाज येत नाहीये , नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** हॅलो

**श्री.नितीन बरडे :-** आवाज कट होतोय येतोय व परत कट होतोय

**श्री.नितीन लढ्ढा :-** नेट संपलय वाटत दोन जीबी नेट संपलना

**मा.सभापती :-** नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा राजुभाऊ

**मा.सभापती :-** नितीनभाऊ आवाज येतोय का माझा

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो आता येतोय आवाज

**मा.सभापती :-** आपण एमजीपीचे अधिकारी , अमृतचे संबंधित अधिकारी , आयुक्त साहेब आपण बसुन याच्यावर सविस्तर चर्चा करू.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो राजुभाऊ माझी आपणांस विनंती तिच आहे कि हा अत्यंत महत्वाचा विषय आहे

**मा.सभापती :-** तुम्ही मांडलेला विषय योग्य आहे आणि ती माहिती असण गरजेच आहे . आपण सगळे बसुन आयुक्त साहेबांकडे याच्यावर चर्चा करू.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ओके, ओके

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** हो बोला ताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** तसाच एक विषय मी मागेपण आठवण करून दिली होती की जे अपार्टमेंट आहेत त्यांचे कनेक्शन बाकी आहेत अजुन अपार्टमेंट साठी आपण काय निर्णय घेणार आहोत.

**श्री.सुशिल साळुंखे,उपअभियंता.पा.पु.विभाग :-** सन्मा.सभापती व सभागृह आता आपण नविन अपार्टमेंट करीता नविन पॉलीसी फायनल करून ती सुरू केलेली आहे. आता फक्त एक प्रश्न विचाराधीन होता की जुने अपार्टमेंट जे आहेत की ज्यांना कनेक्शन चालु आहेत. ते फक्त आता या अमृत मध्ये कश्या पध्दतीने आणता येतील. तर दोन्ही पध्दतीमध्ये समानता नवी व जुनी त्याकरीता आपण ज्या पध्दतीने नविन अपार्टमेंट करीता जो नियम केला आहे तोच जुन्या अपार्टमेंट करीता लागू राहील. फक्त त्यांना आपण एक आता एक महिन्याची नोटीस देतोय. नोटीस आम्ही कराधान व नियमानुसार केलेली आहे. याच्यात फक्त एक अडचणीचा विषय असा होता की जे नळ कनेक्शन आहे ते अपार्टमेंटला आता त्यांचे फ्लॅटस गुणिला दोन हजार या पध्दतीने एप्रिल पासुन ते करता येईल पण लोकांचे पैसे मार्च पर्यंतचे काहींचे भरले गेले आहेत. त्यामुळे आपण प्रत्येकाला एक महिन्याची नोटीस देवु जुन्या अपार्टमेंट मध्ये ८ पेक्षा जास्त फ्लॅट असलेल्यांना त्यांच्यासाठीच हे फक्त आहे. बाकीच्यांना जोडले जातील

**सौ.उज्वला बेंडाळे :-** बर ठिक आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २९२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजवीणे कामी खालील प्रमाणे ई - निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यात खालील मक्तेदार यांनी त्यांच्या नांवा समोर दर्शविल्याप्रमाणे निविदा दर सादर केलेले आहे.

| कामाचे नांव व ई निविदा क्रं. | मक्तेदाराचे नांव | निविदा दर (सन २०१९-२० चे DSR चे दरावर) | वाटाघाटी अंति दर | पुन:श्च वाटाघाटी अंति दर | सन २०२०-२१ चे DSR दरानुसार प्राप्त दर | पुन:श्च वाटाघाटी अंति आलेले दरानुसार होणारा एकुण अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रभाग क्रं.०१ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे (ई निविदा क्रं.४७/०१) | राजकिरण नरेंद्र चौधरी | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर १.९६% जास्तीचे दर | ४९९५६८८/- |
| प्रभाग क्रं.०२ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे (ई निविदा क्रं.४७/०२) | राजकिरण नरेंद्र चौधरी | निविदा रक्कमेवर २.६६% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर २.६६% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर २.६६% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर १.६२% जास्तीचे दर | ४९५२९२६/- |
| प्रभाग क्रं.०३ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे (ई निविदा क्रं.४७/०३) | मकरंद दिलीप सुर्यवंशी | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर १.९६% जास्तीचे दर | ५१२२२१४/- |
| प्रभाग क्रं.०४ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे (ई निविदा क्रं.४७/०४) | निखील कृष्णराज पाटील | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर १.९६% जास्तीचे दर | ५१११४८३/- |
| प्रभाग क्रं.०५ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे (ई निविदा क्रं.४७/०५) | सुशिलकुमार गणपत डोंगरे | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर १.९६% जास्तीचे दर | ५१३४८४३/- |
| प्रभाग क्रं.०६ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे (ई निविदा क्रं.४७/०६) | पंकज गजानन वाघ | निविदा रक्कमेवर ३.०१% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर १.९६% जास्तीचे दर | ४१४७९२१/- |
| प्रभाग क्रं.०७ मधील रस्त्यावरील | रुपेश प्रविण | निविदा रक्कमेवर | निविदा | निविदा रक्कमेवर | निविदा रक्कमेवर | ४९८७७३९/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे (ई निविदा क्रं.४७/०७) | राणे | ३% जास्तीचे दर | रक्कमेवर ३% जास्तीचे दर | ३% जास्तीचे दर | १.९६% जास्तीचे दर | |
| प्रभाग क्रं.०८ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे (ई निविदा क्रं.४७/०८) | डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर १.९६% जास्तीचे दर | ४९१४५८७/- |
| प्रभाग क्रं.१० मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे (ई निविदा क्रं.४७/१०) | योगराज गणेश पाटील | निविदा रक्कमेवर २.९९% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर २.९९% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर २.९९% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर १.९५% जास्तीचे दर | ५०८५०४४/- |
| प्रभाग क्रं.११ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे (ई निविदा क्रं.४७/११) | सुशिलकुमार गणपत डोंगरे | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर १.९६% जास्तीचे दर | ५१२७९२३/- |
| प्रभाग क्रं.१२ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे (ई निविदा क्रं.४७/१२) | साई सागर कंन्स्ट्रक्शन | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर १.९६% जास्तीचे दर | ५१२९६६२/- |
| प्रभाग क्रं.०१३ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे (ई निविदा क्रं.४७/१३) | पी.एस.कुमावत | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर २.५०% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर २.५०% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर १.४६% जास्तीचे दर | ५१०५२४८/- |
| प्रभाग क्रं.१४ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे (ई निविदा क्रं.४७/१४) | डी.एच. पाटील कंन्स्ट्रक्शन | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर १.९६% जास्तीचे दर | ५१३३५१२/- |
| प्रभाग क्रं.१५ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे (ई निविदा क्रं.४७/१५) | राजकिरण नरेंद्र चौधरी | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर १.९६% जास्तीचे दर | ४६९६२३८/- |
| प्रभाग क्रं.१६ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे (ई निविदा क्रं.४७/१६) | सुशिलकुमार गणपत डोंगरे | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर १.९६% जास्तीचे दर | ४९७६९५४/- |
| प्रभाग क्रं.१७ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे (ई निविदा क्रं.४७/१७) | निलेश सुरेश पाटील | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर २.९०% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर २.९०% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर १.८६% जास्तीचे दर | ५०७१०८१/- |
| प्रभाग क्रं.१८ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे (ई निविदा क्रं.४७/१८) | राजकिरण नरेंद्र चौधरी | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ३% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर १.९६% जास्तीचे दर | ४९४१२९५/- |
| प्रभाग क्रं.१९ मधील रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रीत खडीने बुजविणे (ई निविदा क्रं.४७/१९) | डी.एच. पाटील कंन्स्ट्रक्शन | निविदा रक्कमेवर २% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर २% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर २% जास्तीचे दर | निविदा रक्कमेवर ०.९६% जास्तीचे दर | ४९०८७४१/- |

वर नमुद तक्त्यात मक्तेदार यांना पुन:श्च वाटाघाटी साठी बोलवीले असता वर नमुद तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे मक्तेदार यांनी पुन:श्च वाटाघाटी अंति दर दिलेले आहे.

एकुण १८ प्रभागांसाठी मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी व शहर अभियंता यांच्या कडेस दि.१२/११/२०२० रोजी दु.२.०० वाजता मक्तेदारांना वाटाघाटीस बोलविले असता सर्व मक्तेदारांनी त्यांनी दर्शविलेले दर कमी करण्यास नकार दिलेला आहे.

प्रसिध्द निविदेतील दर सन २०१९-२० चे असुन नविन सन २०२०-२१ DSR मधिल दर दि.०१/१०/२०२० पासुन लागू झालेले आहेत या दराशी तुलना केली असता मागील दरापेक्षा १.०४% दर वाढ या नमुद बाबीं करीता येत आहे त्यानूसार तुलनात्मक तक्त्याप्रमाणे मक्तेदार निहाय व प्रभाग निहाय / काम निहाय प्राप्त ई-निविदा दरास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- कोल्हे ललित विजय**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करतो की सर्वांनी राष्ट्रगीत साठी उभे राहायचे आहे.

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**

**सभापती**

**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**